# क्रिक् - पिलक्स

शंतनु कुलकर्णी

ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

# क्रिक फ़्लिक्स

शंतनु कुलकर्णी

ई साहित्य प्रतिष्ठान

# *CricFlicks*




## लेखक- शंतनु लक्ष्मीकांत कुलकर्णी

७०४, कृष्णा प्राईड, सोहम बिल्डींग, श्री कॉम्प्लेक्स जवळ, आरटीओच्या पाठीमागे, कल्याण(पश्चिम)-४२१३०१

जन्म- ८ डिसेंबर १९९०

शिक्षण- एम.टेक (मेकॅट्रॉनिक्स), बी.ई (मेकॅनिकल)

छंद- क्रिकेटविषयी वाचन व लिखाण

मोबाईल नं. ८७६७९८८२६५/ ०८०५६२१२५१६

ईमेल - skcricketarticles@gmail.com, shantanu08k@gmail.com

ब्लॉग- www.skcricketarticles.blogspot.in



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे .तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

## प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन :२७ फ़ेब्रुवारी २०१७ (मराठी भाषादिन)



©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे - आवश्यकआहे .

# मनोगत

माझं हे पहिलंच पुस्तक. क्रिकेटची आवड लागली ती ४-५ व्या वर्षापासुन आणि ती आजही तशीच कायम आहे. क्रिकेट खेळणे तसे चालुच होतं मग त्यात कधी बाबांनी तर कधी काकांनी मदतही केली. दररोज क्रिकेट खेळणे तसा दिनक्रमच झाला होता. लहानपणी माझे आजोबा कै. श्री माधवराव रामकृष्ण पोटेकर यांच्याकडून क्रिकेटची कात्रणं गोळा करण्याचा छंद कधी जडला हेही कळालं नाही तेव्हापासुनच क्रिकेटविषयी वाचण्याची आवड निर्माण झाली. त्याबरोबरच कधी सकाळी ५ ला ऊठुन बाबांसोबत ऑस्ट्रेलियातल्या सामन्यांचा आनंद घेतला तर कधी रात्री जागूनही सामने पाहिले. आवड इतकी लागली होती की दिवसभरही क्रिकेटचे सामने पाहत असे त्यामुळे माझी आई आणि दोन्ही बहिणींनाही तेच पाहाव लागत असे त्याबाबत मी त्यांची माफी मागतो. परिक्षा जरी असली तरीही बाबा धावसंख्या आवर्जुन सांगायचे. तसेच शिक्षणासाठी बाहेरगावी राहिल्याने भ्रमनध्वनीवर बाबांशी बोलताना क्रिकेटचा विषय निघाला नाही तरच नवल.

इंजिनीयरिंगच शिक्षण झालं तरी क्रिकेटची आवड काही केल्या शांत बसु देत नव्हतं. क्रिकेटचा विषय निघाला की बोलण्यात कसा वेळ जायचा ते कळत नसे आणि मिळेल त्यावेळेस क्रिकेटचे सामने पाहत असे. तसं लहानपणी घरी वर्तमानपत्र आल्यानंतर पहिल्यांदा क्रिकेटच्या बातम्या वाचुनच उर्वरीत बातम्यांकडे लक्ष जात असे. तसं लेखन करण्याचा कधीही प्रयत्न केला नव्हता एवढच काय तर १२ वी पर्यंत परिक्षा सोडून इतर कधीही निबंध वा पत्र लिहिले नव्हते. पण २०१५ मध्ये चेन्नईत असताना क्रिकेटविषयी सहज एक लेख लिहिला त्यावर कुटुंबियाने व मित्र परिवाराने प्रोत्साहन दिले आणि त्यातून नवीन गोष्टी सुचत गेल्या मग सर्वप्रथम आत्ये भाऊ वसंत कुलकर्णीच्या मदतीने क्रिकेट आर्टिकल्स नावाने फेसबुक पेज तयार केले. लिखाण जसेजसे वाढत गेले तसं क्रिकेट आर्टिकल्स चा ब्लॉग तयार केला.

तसेच क्रिकेट समीक्षक व्दारकानाथ संझगीरीनी देखील लेखाला पसंती दर्शवली याची खुप मोठी मदत झाली. अशाच लेखांची बांधणी या पुस्तकातून केली आहे. या पुस्तकाच्या बांधणीसाठी माझ्या घरच्या सर्वांकडून प्रोत्साहन मिळालेच तसेच यात वसंतची भुमिका अत्यंत अनमोल आहे. तसेच ई साहित्यचे मन:पुर्वक आभार. त्यांच्याच सहकार्यामुळे मी माझे पहिले पुस्तक प्रकाशित करु शकलो. त्यामुळे मी ई-साहित्य प्रतिष्ठानचा अत्यंत ऋणी आहे.

शेवटी असे सांगावसे वाटते माझ्या कुटुंबासाठी, मित्रांसाठी मी लेखक झालो याचे खरे श्रेय आपल्या सारख्या वाचकांना आहे. या सर्वांना माझे विनम्र आभिवादन वाचकांनी मला खऱ्याखुऱ्या प्रतिक्रिया कळवून  माझे लिखाण अजुन चांगले व्हावे यासाठी मदत करावी एवढीच अपेक्षा.

हे पुस्तक प्रकाशित व्हावे यासाठी झटणाऱ्या व प्रोत्साहन देणाऱ्या प्रत्येकाचे आभार

शंतनु कुलकर्णी

क्रिकटवरील माझे हे पहिले पुस्तक

विद्येची देवता सरस्वती,

कुलदैवत लक्ष्मीव्यंकटेश,

आई वडील

व वाचकांच्या चरणी अर्पण करतो.

**शंतनु कुलकर्णी**

अनुक्रमणिका

१. महेंद्रसिंग धोनी

२. विराट कोहली

३. रोहित शर्मा

४. अजिंक्य रहाणे

५. शिखर धवन

६. सुरेश रैना

७. रविचंद्रन अश्विन

८. रविंद्र जडेजा

९. चेतेश्वर पुजारा

१०. मुरली विजय

११. मनीष पांडे

१२. के एल राहुल

१३. भुवनेश्वर कुमार

१४. मोहम्मद शमी

१५. उमेश यादव

# महेंद्रसिंग धोनी

महेंद्रसिंग धोनी नाव जगातील सर्वोत्कृष्ट कर्णधारामध्ये घेतले जाते त्याचबरोबर भारताकडून सौरव गांगुलीनंतर एक सर्वोत्कृष्ट कर्णधार. सुरुवातीला भारतीय क्रिकेट संघामध्ये मुंबई, दिल्ली, बंगलोर, चेन्नई यासारख्या मोठ्या शहरातून आलेल्या खेळाडूंचे प्रमाण मोठे होते. परंतु काही कालावधी नंतर झहीर खान, महेंद्रसिंग धोनी, आर पी सिंग आणि सध्याच्या भारतीय संघाचे फलंदाजीचे प्रशिक्षक संजय बांगर यांनी आपल्या विभागाचे नाव जागतिक पातळीवर नावारुपास आणले.



भारतीय संघात दाखल होण्यापूर्वी धोनी खरगपूर रेल्वे विभागात तिकीट तपासणीस म्हणुन काम करत होता तेव्हा तो रेल्वे विभागाकडून क्रिकेट खेळू लागला. आपल्या क्रिकेटमध्ये केलेल्या प्रगतीच्या जोरावर भारतीय संघात स्थान मिळविले. फुटबॉल खेळत असताना गोलरक्षकाची भुमिका घेण्यास सुरुवात केली. रांची सारख्या छोट्या शहरातून आलेल्या धोनीला गांगुलीसारख्या सर्वोत्कृष्ट कर्णधाराकडून पर्दापणाची संधी मिळाली. आपल्या पहिल्या तीन सामन्यात धोनीला साजेशी कामगिरी करण्यात अपयश आले परंतु त्यानंतर पाकिस्तान विरूद्ध झालेल्या मालिकेत फरीदाबादमध्ये झालेल्या सामन्यात तीसऱ्याक्रमांकावर येताना १४८ ची खेळी करून एका नव्या आध्यायाला सुरुवात केली आणि आपले पहिले शतक झळकावले. श्रीलंकेविरुध्द धावांचा पाठलाग करताना नाबाद १८३ धावांची खेली केली. ज्यात ११ षटकारांचा समावेश होता आणि १० षटकारांच्या विक्रमांची बरोबरी केली त्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या शेन वॉटसन ने बांगलादेश विरूध्द खेळताना १५ षटकार मारून विक्रम मोडला.

भारताच्या पाकिस्तान दौऱ्यातधोनीने आपल्या केसरचनेनी तसेच आपल्या खेळीने त्यावेळेसच्या पाकिस्तानच्या राष्ट्रपतीपदी असलेल्या परवेझ मुशरर्फ यांना भुरळ घातली होती. धोनीने एकदिवसीय सामन्यांनबरोबरच कसोटी सामन्यात सुध्दा पदार्पण केले आणि संघाचा एक अविभाज्य भाग बनला. एकहाती सामना फिरवण्याची ताकद यामुळे त्याने भारताला अनेक विजय मिळवून दिले. आपल्या कारकिर्दितील पहिला विश्वचषक खेळणाऱ्याधोनीला साजेशी कामगिरी करता आली नाही. विश्वचषकानंतर भारताचा इंग्लड दौरा होता यात पहिल्या कसोटी सामन्यात भारताचा पराभव टाळला तर दुसऱ्या सामान्यात झालेल्या भारताच्या विजयात मोलाची कामगिरी बजावली आणि भारताला कसोटी मालिका जिंकण्यात यश आले त्यानंतर झालेल्या एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत भारताला पराभव स्विकारावा लागला या मालिकेत धोनी पूर्णपणे अपयशी ठरला.

२००७ साली झालेल्या पहिल्या टि-२० विश्वषचषकातून सचिन, द्रविड व सौरवने माघार घेतल्याने कर्णधारपदाची पहिल्यांदा धोनीला जबाबदारी देण्यात आली. तसेच एकदिवसीय मालिकेत झालेल्या पराभवामुळे द्रविडने कर्णधार पदाचा राजीनामा दिला होता. २००७ च्या टि-२० विश्वचषकात धोनीन आपल्या नेतृत्वाने तसेच दक्षिण आफ्रिकेविरुद्ध व उपांत्य सामन्यात केलेली छोटेखानी खेळी सामन्याला कलाटणी देणारी ठरली आणि भारताला विश्वचषक जिंकून दिला.आपल्या पहिल्याच कर्णधारपदाच्या परीक्षेत चांगले यश मिळविल्यानंतर त्यालाच भारताच्या एकदिवसीय संघाचा कर्णधार म्हणून नेमण्यात आले यात कर्णधार नेमण्यात सचिन तेंडूलकरची भुमिका महत्त्वाची होती. धोनीच्या कारकिर्दीतील

महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्याच्या नेतृत्वात भारताने ऑस्ट्रेलियात २००८ साली जिंकलेली तिरंगी स्पर्धा, २०१० ची आशिया चषक स्पर्धा व न्युझिलंडमधील एकदिवसीय मालिका. २०१० साली भारतात झालेल्या बॉर्डर-गावसकर मालिकेत कसोटी कर्णधार अनिल कुंबळेनी निवृत्ती घेतली आणि एकदिवसीय व टी-२० बरोबरच कसोटी कर्णधारपदी नेमणूक केली आणि आपल्या पहिल्याच सामन्यात विजय मिळवून दिला.

महेंद्रसिंग धोनीच्या कारकिर्दितला एक महत्त्वाचा क्षण होता तो म्हणजे २०११ चा विश्वचषक. विश्वचषकापूर्वी संघाची कामगिरी तसेच १५ वर्षानंतर भारतीय उपखंडात झालेला विश्वचषक यामुळे भारताला प्रबळ दावेदार मानत होते. संपूर्ण विश्वचषकात धोनीला कामगिरी करण्यात अपयश आले होते पण विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात धावांचा पाठलाग करताना सलामीवीर झटपट बाद झाले त्यानंतर गंभीर व कोहलीने डाव सावरण्याचा प्रयत्न केला परंतु परिस्थिती सावरते असे असतानाच कोहली बाद झाला आणि विश्वचषकात पहिल्यांदा धोनी युवराजच्या आधी फलंदाजीला आला आणि ९३ धावांची नाबाद खेळी करुन त्याने भारताला विश्वचषक जिंकून दिला तसेच धोनीला अंतिम सामन्याचा मानकरी म्हणून निवडण्यात आले.

विश्वचषकानंतर झालेल्या इंग्लंड दौऱ्यात भारताला ४-० ने कसोटी मालिकेत पराभव स्विकारावा लागला तसेच एकदिवसीय मालिकेत ३-० ने पराभव झाला. एका सामन्यात धोनीले केलेल्या फटकेबाजीच्या बळावर सामना बरोबरीत सोडवण्यात यश आले. इंग्लंड दौऱ्यात झालेला पराभवातून संघ बाहेर येतो न तोच संघाला ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी मालिकेत ४-० ने हार पत्करावी लागली तसेच तिरंगी एकदिवसीय मालिकेच्या अंतिम फेरीत स्थान मिळवण्यात संघ अपयशी ठरला. भारताची विदेशी भुमिवरची कामगिरी खालावत गेल्याने धोनीला प्रसारमाध्यमांना तोंड द्यावे लागले तसेच कर्णधारपदाच्या राजीनाम्याची मागणीला जोर धरु लागली.

२०१२ मध्ये पाकिस्तानविरुद्ध मायदेशात झालेल्या मालिकेतही भारताला २-१ ने पराभव स्विकारावा लागला. मालिकेतल्या पहिल्याच सामन्यात आघाडीच्या फलंदाजांनी जुनैद खान आणि महम्मद इरफान समोर नांगी टाकली त्यानंतर धोनीने अश्विनच्या साथीने महत्त्वाची भागिदारी करत शतक झळकावले व भारताला आव्हानात्मक धावसंख्या उभारुन दिली. धोनीने भारतीय संघाबरोबरच आयपीएल मध्ये ८ वर्षे चेन्नई सुपर किंगचे नेतृत्व केले या

८ वर्षात धोनीने संघाला २ वेळेस विजेतेपद तसेच ४ वेळेस उपविजेतेपद मिळवून दिले त्याचबरोबर चॅम्पियन लीग मध्ये दोनदा विजेतेपद मिळवून दिले.

२०१३ ची चॅम्पियन ट्रॉफी भारताला आशेचा किरण घेउन आली. इंग्लंडमध्ये झालेल्या चॅम्पियन ट्रॉफीत एका युवा भारतीय संघाने सर्व मोठ्या संघांचा पराभव करुन अंतिम सामन्यात इंग्लंडचा पराभव केला. इंग्लंडमधील वातावरण हे वेगवान गोलंदाजासाठी अनुकुल असते पण चॅम्पियन ट्रॉफी पूर्वी झालेल्या ऍशेस मालिकेसाठी इंग्लंडनेफिरकी गोलंदाजासाठी अनुकुल खेळपट्या तयार केल्या होत्या हीच गोष्ट भारतीय फिरकीपटूंच्या पदरी पडली आणि रविंद्र जडेजाने सर्वाधिक विकेट घेऊन सर्वोत्कृष्ट गोलंदाजाचा पुरस्कार मिळविला. या स्पर्धेत भारताने अंतिम सामनाधरुन सर्वच सामने जिंकले.

धोनी ज्याप्रकारे आयपीएल सामन्यात फलंदाजी करतो तशी फलंदाजी आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये करण्यात तो अपयशी ठरला. २०१४ च्या टी-२० विश्वचषकात भारत अंतिम सामन्यात दाखल झाला आणि भारताला श्रीलंकेकडून पराभव स्विकारावा लागला. भारताला दक्षिण आफ्रिका व न्युझिलंडविरुद्ध झालेल्या मालिकेमध्ये पराभवाला समोरे जावे लागले. इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत भारताला लॉर्डसचा कसोटीसामना जिंकण्यात यश आले परंतु कसोटी मालिकेत पराभव स्विकारावा लागला पण त्यानंतर झालेल्या एकदिवसीय मालिकेत विजय संपादन केला भारतामध्ये २०१३ साली झालेल्या बॉर्डर-गावसकर मालिकेत भारताने ऑस्ट्रेलियाला ४-० ने लोळवले या मालिकेच्या पहिल्याच सामन्यात चेन्नईत व्दिशतक झळकावूनभारताकडून कसोटीतव्दिशतकझळकावलेला पहिला यष्टिरक्षक ठरला.

ज्याप्रमाणे धोनीने फलंदाजी व कर्णधारपदात संघाची कामगिरी ही वेगळयाच एका स्थरावर नेऊन ठेवली. मग ते 'हेलिकॉप्टर शॉट' असो वा भारताच्या मर्यादित षटकांच्या सामन्यांतील आजपर्यंतचा सर्वोत्तम कर्णधार असो. त्याच्या नेतृत्वात संघाने २००७ चा टी-२० विश्वचषक, २०११ चा ५०-५० विश्वचषक आणि २०१३ मध्ये चॅम्पियन ट्रॉफीला गवसणी घातली अशी कामगिरी करणारा तो जगातील एकमेव कर्णधार आहे. तसेच तो तंत्रशुद्ध फलंदाज नाही हे त्याने स्वत:ही सांगितले आहे आणि ते त्याच्या फलंदाजीतून सुद्धा दिसुन येते पण त्यातही त्याला इतके यश लाभले हे कौतुकास पात्र आहे.

ज्याप्रकारे त्याने कर्णधापदी कामगिरी केली त्याचप्रमाणे त्याने यष्टिरक्षणसुद्धा एकदम वरच्या पातळीवर नेऊन ठेवले आहे. मग ते झेल घेणे असो वा यष्टिचित करणे असो.

काही वेळा तर तो यष्टिंवर आलेली थेट फेक न पकडता यष्टिंकडे न पाहता चेंडू फेकुन फलंदाजांना बाद केले तर सर्वाधिक यष्टिचित करण्याचा विक्रम त्याने त्याच्या नावे केला आहे. असंच २०१६ च्या टी-२० विश्वचषकात बांग्लादेशविरुद्धच्या सामन्यात बांग्लादेशला जिंकण्यासाठी शेवटच्या चेंडूवर २ धावांची गरज होती त्यावेळेस परिस्थितीचे भान ठेऊन गोलंदाज हार्दिक पंड्याला चेंडू थोडी उजव्या यष्टी बाहेर टाकण्यास सांगितले तसेच चेंडूची चांगली पकड व जलदगतीने चेंडू फेकण्यासाठी धोनीने उजव्या हाताचा ग्लोज काढुन टाकला व त्यात तो यशस्वी सुद्धा झाला.

२०१४-१५ चा ऑस्ट्रेलिया दौरा भारतासाठी मोठा तसेच आव्हानात्मक दौराहोता. कसोटीमालिकेत पहिल्या सामन्यात धोनी दुखापतग्रस्त असल्याने खेळु शकला नव्हता परंतु मालिकेतला दुसरा सामना धोनीसाठी कारकिर्दीतला शेवटाचा कसोटी सामना ठरला आणि एकदिवसीय व टी-२० स्पर्धांवर लक्ष देण्यासाठी कसोटीतून निवृत्ती घेतली. परंतु एकदिवसीय मालिकेत वविश्वचषकात झिम्बांव्वे विरूध्दचा सामना सोडता धोनी पुर्णपणे अपयशी ठरला.विश्वचषकानंतरच्या बांगलादेशविरूध्दच्या मालिकेत भारताला २-१ ने पराभव स्विकारावा लागला. पहिल्या सामन्यात अजिंक्य रहाणे अपयशी ठरल्यानंतर त्याला संघाबाहेर बसावे लागले याबाबत विचारले असता धोनीने सांगितले की उपखंडात रहानेला स्ट्राईक रोटेट करण्यात अडचन येते तसे पाहता जेव्हा धोनीला पुर्णवेळ कर्णधार म्हणून नेमले गेले त्यानंतर राहुल द्रविड व व्ही. व्ही. एस लक्ष्मण ने निवृत्ती जाहिर केली. लक्ष्मणने तर संघात समावेश झाल्यानंतर निवृत्ती जाहिर केली होती धोनीला पहिल्यापासुन युवा संघ हवा होता त्यामुळे सेहवाग, युवराज, द्रविड, झहीर खान, लक्ष्मण व गंभीर ला टीम पासुन बाहेर बसावे लागले.

२०१५ च्या आफ्रिकाविरुद्धच्या टी-२० मालिकेत धोनी पुर्णपणे अपयशी ठरला तर एकदिवसीय मालिकेतील इंदोरच्या सामन्यात ९२ धावांची खेळी करत संघाला एक आव्हानात्मक धावसंख्या उभारुन दिली. तर काही सामन्यात चौथ्या क्रमांकावर फलंदाजीस येत मालिकेत सातत्याने धावा काढणाऱ्या रहाणेची जागा प्रत्येक सामन्यागणिक बदलु लागला. त्यामुळे त्याच्यावर टिकाही झाली. त्यानंतर २०१६ मध्ये ऑस्ट्रेलियात झालेल्या एकदिवसीय मालिकेतील ४ सामन्यात धोनी अपयशी ठरला पण शेवटच्या सामन्यात ३४ धावांची खेळी करत शतकवीर मनिष पांडे सोबत ९४ धावांची भागिदारी करत मालिकेत एकमेव विजय मिळवून  दिला आणि हाच विजय भारताला टी-२० मालिकेत ३-० ने विजय मिळवून  देण्यात महत्त्वाचा ठरला.

धोनीची अपयशाची मालिका श्रीलंकेविरुद्धच्या टी-२० मालिकेत व २०१६ च्या टी-२० विश्वचषकातही सुरुच राहिली. पण अमेरिकेत वेस्ट इंडिजविरुद्ध झालेल्या पहिल्या टी-२० मध्ये ४३ धावांची खेळी करत के एल राहुलला साथ देत १०७ धावांची भागिदारी रचली पण तो संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरला व भारताला १ धावेने सामना गमवावा लागला. तर त्याची न्युझिलंडविरुद्धची कामगिरी त्यातला त्यात ठीक झाली. पहिल्या दोन सामन्यात मालिका १-१ ने बरोबरीत झाल्यानंतर तीसऱ्या सामन्यात विजय मिळवून आघाडी मिळवण्याती दोन्ही संघ आतुर होते. न्युझिलंडने भारतासमोर २८५ धावांचे आव्हान ठेवले होते. २ बाद ४१ अशी अवस्था झाल्यानंतर कोहली व धोनीच्या जोडीने १५० धावांची भागिदारी करत भारताला विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भुमिका बजावली यात धोनीने ८० धावांची उपयुक्त खेळी केली तसेच भारताने मालिकेत ३-२ ने विजय संपादन केला.तब्बल ८ वर्षे आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंगचे नेतृत्व केल्यानंतर २०१६ मध्ये रायझिंग पुणे सुपरजायंट्सचे नेतृत्व केले. चेन्नई सोबतच्या ८ सत्रात त्याने संघाला ६ वेळेस अंतिम सामन्यात प्रवेश मिळवून दिला आणि त्यातील २ वेळेस विजेतेपद मिळवून दिले व २ वेळेस चॅम्पियन लीगचे विजेतेपद मिळवून दिले खरे पण त्याप्रकारचा त्याचा करीष्मा २०१६ मध्ये चालला नाही आणि संघाला ७ व्या स्थानावर समाधान मानावे लागले.

धोनीने रहाणे बाबत दिलेले उत्तर पटत नाही. धोनी म्हणतो की रहाणे पहिल्या तीन स्थानांवरच खेळु शकतो पण ज्याप्रकारे रहाणेची कसोटील कामगिरी पाहता रहाणे कोणत्याही स्थानावर खेळु शकतो तसे पाहता ज्याप्रकारे द्रविड ने आपल्या कारकिर्दीत ४-५ क्रमांकावर खेळुन १०,००० पेक्षा जास्त धावा केल्या त्यामुळे रहाणेची शैली पाहता ४ क्रमांकावर खेळू शकतो. पण त्यावेळेस धोनीला वरच्या क्रमांकावर फलंदाजीला यायला पाहिजे होते त्यावेळेस खालच्या क्रमांकावर येण्यास पसंती देत. धोनी कर्णधार झाल्यापासुन आयपीएल मधील धोनीच्या चेन्नई सुपर किंग संघातील खेळाडूंचा मोठ्या प्रमाणावर भारतीय संघात समावेश झाला त्यात आश्विन, जडेजा, मोहित शर्मा, बालाजी, मुरली विजय यातील आश्विनने मुरली विजयने चांगल्याप्रकारे कामगिरी केली परंतु मोहित शर्मा जो फक्त आपीएलच्या कामगिरी वर संघात कायम आहे. रैना व जडेजाने काही प्रमानात कामगिरी केली पण रैनाला फलंदाजीत बढती साठी धोनी रहाणेचा बळी देतो आहे का? जडेजा सुध्दा एक गोलंदाज म्हणुन कामगिरी करतो पण त्याला एक अष्टपैलु म्हणुन संघात ठेवले होते. रहाणे सारखे खेळाडू हे संघातील राजकारणाचे बळी ठरत आहेत का?

## विराट कोहली

विराट कोहली आपल्या फलंदाजीने भारताचा एक अतिमहत्त्वाचा खेळाडू बनला. सद्यपरिस्थीत कोहलीने क्रिकेट जगतात एक उत्तम खेळाडू नाव मिळविले. राजधानी दिल्लीत जन्मलेला कोहली लहानपणापासुन सचिनला पाहून मोठा झाला. कोहलीने २००६ साली दिल्लीकडून खेळताना देशपातळीवर पदार्पण केले. एक सामना खेळत असताना कोहलीच्या वडीलांच्या निधनाची वार्ता आली त्यावेळेस तो दिवसअखेर नाबाद होता त्यानंतर त्याने सर्व विधी पार करुन विराटने दुसऱ्या दिवशी फलंदाजीकरुन शानदार शतक झळकावले.




२००८ साली मलेशियात झालेल्या १९ वर्षांखालील विश्वचषकात विराटकडे भारतीय संघाची धुरा देण्यात आली. या स्पर्धेत विराटने आपल्या नेतृत्वाने व फलंदाजीने सर्वांनाच भूरळ घातली आणि भारताला २००० नंतर पुन्हा एकदा विश्वचषक जिंकून दिला. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात विराटने आपल्या नेतृत्व गुणांची चुणूक दाखवली. आपल्या

कामगिरीने त्याने निवड समितीचे लक्ष्य वेधले आणि २००८ ला कोहलीला श्रीलंकेविरुद्ध पर्दापणाची संधी मिळाली ज्यात वरिष्ट खेळाडूंना विश्रांती देण्यात आली होती. २००९ मध्ये विराटची सरासरी कामगिरी झाली पण २०१० ते २०१४ या वर्षामध्ये विराटने सरासरी १००० धावा केल्या आणि या कालावधीत मधल्या फळीतील महत्त्वाचा फलंदाज म्हणून नाव कमावले तसेच जागतिक पातळीवर सुद्धा त्याची तुलना मोठ्या फलंदाजांमध्ये होऊ लागली.

विराटने आपल्या कामगिरीच्या जोरावर संघातले स्थानपक्के केले व विश्वचषकाच्या संघात स्थान मिळविले.विराटने आपल्या पहिल्या विश्वचषकाच्या पहिल्याच सामन्यात बांग्लादेशविरुद्ध खेळताना शतक झळकावले आणि विरेंद्र सेहवाग सोबत मोठी भागिदारी रचली. परंतु पहिल्या सामन्यानंतर कामगिरीत सातत्य राखण्यात विराट अपयशी ठरला पण अतिम सामन्यात सलामीवीर लवकर बाद झाल्यानंतर भारतीय संघ अडचणीत सापडला होता परंतु विराटने गंभीरच्या साथीने डाव सावरला व भारताला विश्वचषक जिंकवण्यात महत्त्वाची भुमिका बजावली.

२०११ च्या विश्वचषकानंतर झालेल्या वेस्ट इंडिजदौऱ्यात कोहलीला कसोटी सामन्यात पर्दापणाची संधी मिळाली ती त्याने एकदिवसीय सामन्यात केलेल्या कामगिरीवर. विराटने त्याचे कसोटीतील पहिले शतक झळकावले ते ऑस्ट्रेलियासारख्या भक्कम संघाविरुद्ध ते सुद्धा ऑस्ट्रेलियात. कसोटी मालिकेनंतर भारत, ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंकामध्ये एकदिवसीय सामन्यांची तिरंगी मालिका खेळवली गेली. या मालिकेतील एका सामन्यात भारताला विजय मिळवून अंतिम सामन्यात खेळण्याची एक संधी निर्माण होणार होती. भारताला धावांचा पाठलाग करायचा होता श्रीलंकेने ३०० पेक्षा जास्त धावा केल्या होत्या जर भारतानी हे लक्ष्य ४० षटकांत पार केले तर भारताला मोठा विजय मिळणार होता. या सामन्यात विराटने १३८ धावांची झंझावती खेळी केली आणि मलिंगाच्या गोलंदाजीची पिसे काढली.

त्यानंतर २०१२ साली बांग्लादेशमध्ये झालेल्या आशिया कप मध्येपाकिस्तानविरुद्ध झालेल्या सामन्यात विराटने १८३ धावांची खेळी करत एकदिवसीय कारकिर्दितील आपली सर्वोच्च खेळीची नोंद केली आणि भारताला यशस्वी धावांचा पाठलाग करुन दिला. विराटची गणना धावांचा यशस्वी पाठलाग करणाऱ्या फलंदाजामध्ये होते याची वेळोवेळी प्रचिती येते. २०१३ साली मायदेशात ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या एकदिवसीय मालिकेत भारताला मालिका जिंकवण्यात महत्त्वाची भुमिका निभावली. या मालिकेत त्याने भारताकडून एकदिवसीय

सामन्यात सर्वात जलद शतक झळकावण्याचा विरेंद्र सेहवागचा विक्रम मोडीत काढला आणि ५२ चेंडूत शतक झळकावले.

२०१४-१५ ची ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मलिकेत पहिल्या सामन्यात धोनीच्या अनुपस्थित कर्णधारपद भुषवले. दुसऱ्या सामन्यानंतर धोनीने कसोटीतून निवृत्ती जाहीर केली आणि विराटला कसोटीचा पुर्णवेळ कर्णधार म्हणून नेमन्यात आले. या मलिकेत त्याने धावांचा पाऊस पाडत चार शतके झळकावली. भारताला २०१४ च्या टी-२० विश्वचषकात भारताला अंतिम सामन्यात पोहचवण्यात विराटची मोठी भुमिका होती यात त्याने सर्वाधिक धावा केल्या पण विराटच्या धावा भारताला पराभवापासून दूर ठेऊ शकले नाहीत.

२०१५ च्या विश्वचषकाची सुरवात देखिल विराटने २०११ च्या विश्वचषकाप्रमाणेच शतक झळकावून केली. पाकिस्तानविरुद्ध खेळलेल्या सामन्यात १०७ धावांची खेळी केली. परंतु उर्वरीत सामन्यात त्याला ५० चा आकडाही पार करता आला नाही आणि भारताला उपांत्य सामन्यात पराभव स्विकारावा लागला. २०१५ च्या श्रीलंकेविरुद्धची कसोटी मालिका भारताने २-१ ने खिशात घातली यात विराटने पहिल्यांदाच एक पूर्णवेळ कर्णधार म्हणून कर्णधारपद भुषवले होते. अनेक वर्षानंतर भारताला श्रीलंकेत कसोटी मालिका जिंकवण्यात यश आले. मायदेशात प्रथमच विराट दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कसोटीत कर्णधारपद भुषवित होता यात त्याने भारताला ३-० ने विजय मिळवून दिला तसेच भारताला कसोटी क्रमवारीत अग्रस्थानी नेऊन ठेवले.

२०१६ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या एकदिवसीय आणि टी-२० मालिकेत विराटने धावांचा पाऊस पाडला. एकदिवसीय मालिकेत त्याने दोन शतकांसोबत दोन अर्धशतके झळकावली पण भारताला ४-१ ने मालिकेत पराभव स्विकारावा लागला. या पराभवाची परतफेड भारताने टी-२० मालिका ३-० ने जिंकुन केली. टी-२० मालिकेत विराटने नाबाद ९०, नाबाद ५९ आणि ५० धावांच्या खेळी केल्या. तसेच टी-२० विश्वचषकात पाकिस्तान आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या महत्त्वाच्या सामन्यात अर्धशतकी खेळी केल्या. तसेच वेस्ट इंडिजविरुद्ध झालेल्या उपांत्य सामन्यात नाबाद ८९ धावांची खेळी केली आणि मोठी धावसंख्या उभारुन दिली पण गोलंदाजाच्या कामगिरीने पराभवाला सामोरे जावे लागले. विराटला २०१४ च्या विश्वचषकाप्रमाणेच २०१६ च्या टी-२० विश्वचषकात सुद्धा स्पर्धेचा मानकरी ठरला.

२०१६ सालची आयपीएल स्पर्धा विराट कोहलीच्या नावाने नेहमीच ध्यानात राहील. यात बेंगलुरु संघाचे नेतृत्व करत विक्रमी ९७३ धाव ठोकल्या ज्यात ४ शतकांचा

समावेश होता या कामगिरीच्या जोरावर कोहलीने संघाला अंतिम सामन्यात धडक मारुन दिली पण अंतिम सामन्यातील ५४ धावांची खेळी संघाला पराभवापासुन रोखु शकली नाही. या स्पर्धेत विराट कोहलीला स्पर्धेचा मानकरी म्हणून गौरविण्यात आले.२००५ मध्ये मायदेशात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कसोटीमालिकेत भारताला यश मिळवून  दिले पण कोहलीची परिक्षा होती ती विदेशात ते ही भारतीय उपखंडाबाहेर. 2016 च्या आयपीएल सत्रात सर्व विक्रम आपल्या नावे केल्यानंतर भारतीय संघ वेस्ट इंडिज दौच्यावर गेलातेही ४ कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी. २०११ मध्ये कसोटी पर्दापण केल्यानंतर ते वेस्ट इंडिज विरूद्धच्या मालिकेपर्यंत विराटला व्दिशतक झळकावत आले नव्हते पण मालिकेतल्या पहिल्याच सामान्यात कारकिर्दीतले पहिले द्विशतक झळकावत संघाला मोठी धावसंख्या उभारून दिली आणि भारताने एक डाव व ९२ धावांनी विजय संपादन केला. उर्वरित मालिकेत विराट अपयशी ठरला परंतु त्यांच्या नेतृत्वात भारताने २-० ने मालिका खिशात घातली. वेस्ट इंडिज दौऱ्यानंतर भारताचा मायदेशात सामना होता न्युझिलंडविरूद्ध मालिकेतल्या पहिल्या दोन सामन्यांतील चार डावात विराटला फक्त ८१ धावा करता आल्या पण याची कसर त्याने इंदोरमध्ये झालेल्या सामन्यात काढली. या सामन्यात २११ धावांची खेळी करत मालिकेत ३-० ने विजय मिळवला आणि संघाला कसोटी क्रमवारित पहिला क्रमांक मिळवून  दिला. कसोटी मालिकेनंतर झालेल्या एकदिवसीय मालिकेत विराटची बॅट चांगलीच तळपली यात त्याने एक शतक व दोन अर्धशतकांच्या साह्याने ३५८ धावा काढल्या यात तीसऱ्या सामन्यात धावांचा पाठलाग करताना केलेली नाबाद १५४ धावांची खेळी सर्वोच्च ठरली त्यासोबतच भारताने ३-२ ने एकदिवसीय मालिका जिंकली

न्युझिलंडनंतर इंग्लंडचा संघ भारत दौऱ्यावर आला. या मालिकेच महत्त्वच काही वेगळं होत. २०१२ ची इंग्लंड विरूद्धची कसोटी मालिकेत ही भारताने १-२ ने गमावली होती तसेच २०१४ ची इंग्लंडमधील मालिकेतही भारताला १-३ ने पराभव पत्कारावा लागला होता. त्यामुळे कर्णधार कोहली समोर इंग्लंडचे मोठे आव्हान उभे राहिले होते पण कोहली इंग्लंडला पुरुन उरला आणि कारकिर्दितली एक अनोखी मालिका खेळली. या मालिकेतील मुंबई येथे झालेल्या चौथ्या सामन्यात कारकिर्दीतल तीसर द्विशतक झळकावत मालिकेत ६५५ धावा ठोकल्या आणि भारताला ४-० ने अविश्वसनीय मालिका विजय मिळवून दिला. अशीच कामगिरी तो इंग्लंडविरूद्धच्या उर्वरित मालिकेत तसेच बांगलादेश व ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत ही करेल अशी आशा आहे. आतापर्यंत भारताने विराटच्या नेतृत्वात मायदेशात एकही सामना गमावला नाही.

## रोहित शर्मा

भारतीय एकदिवसीय संघाचा सलामीवीर. नागपुरमध्ये जन्मलेल्या या खेळाडुने मुंबईमध्ये आपल्या क्रिकेट कारकिर्दीला सुरुवात केली. मुंबई म्हणजे देशातील क्रिकेटचे मुख्य केंद्र याच क्रिकेटसाठीच्या पोषक वातावरणात त्याने सुरुवातीला क्लब क्रिकेट,१९ वर्षांखालील स्पर्धात केलेल्या मेहनतीने व कामगिरीच्या जोरावर भारताच्या १९ वर्षांखालील संघात दाखल झाला. कालगिरीत सातत्य राखून त्याने मुंबईच्या रणजी संघात आणि त्यानंतर भारताच्या एकदिवसीय संघामध्ये समावेश झाला.

२००७ साली पदार्पणाच्या सामन्यामध्ये त्याला ठसा उमटवता आला नाही पण ज्यावेळी सचिन,द्रविड आणि गांगुली यांनी दक्षिण आफ्रिकेत झालेल्या पहिल्या टि-२० विश्वचषकात खेळण्यास नकार दिल्यानंतर एक युवा संघ स्पर्धेत पाठवण्यात आला त्यात रोहितचा समावेश होता.पहिल्या काही सामन्यात त्याला संधी मिळाली नाही पण दक्षिण आफ्रिकेविरुदधच्या महत्त्वाच्या सामन्यात त्याने संधीचे सोने केले.याच सामन्यात अर्धशतक झळकावत त्याने भारताला मोठी धावसंख्या उभारुन दिली तसेच क्षेत्ररक्षणात सुदधा चपळाई एका थेट फेकीवर फलंदाजाला धावबाद केले अशाच कामगिरीची पुनरावृत्ती करत अंतिम सामन्यात छोटेखानी पण महत्त्वाची खेळी केली आणि भारताला विश्वचषक जिंकवण्यात महत्त्वाची भुमिका निभावली.



२००८ साली ऑस्ट्रेलियात झालेल्या कॉमनवेल्थ चषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळताना त्याने एका कसलेल्या फलंदाजाप्रमाने फलंदाजी करत सचिनच्या साथीने मोलाची भागीदारी करुन भारताला मालिका जिंकुन दिली.टी-२० क्रिकेटमध्ये भारताकडून शतक झळकावण्याचा पहिला मान रोहितला जातो. निवृत्त खेळाडु तसेच भारताच्या सध्याच्या कर्णधाराला सुद्धा रोहितमध्ये असलेल्या क्रिकेट कौशल्यामुळे खूप अपेक्षा आहेत. संधी मिळत गेल्या पण रोहित हवी तशी कामगिरी करण्यात अपयशी ठरत होता. अपयशी ठरत असताना देखिल धोनी संधी देत होता आणि या कारणामुळे त्याला पत्रकारांना सुद्धा तोंड द्यावे लागत होते.

आयपीएल मध्ये कामगिरी होत होती पण एकदिवसीय सामन्यात कामगिरी करण्यात तो अपयशी ठरत होता. त्यात २०१० साली कसोटीत पर्दापणाची संधी आली होती पण सामना सुरु होण्यापुर्वी फुटबॉल खेळताना दुखापत झाली आणि त्याला संधीपासुन मुकावे लागले.त्यानंतर सुमारे तीन वर्षांनंतर सचिनच्या निवृत्तीच्या मालिकेमध्ये त्याला संधी मिळाली आणि आलेली संधी दोन्ही हातांनी पकडून दोन्ही सामन्यात शतके झळकावली.२०११ विश्वचषकाच्या संघात स्थान न मिळाल्याने निराश न होता त्याने कसुन मेहनत घेतली.

आयपीएल मध्ये पहिली काही वर्षे हैद्राबाद संघाकडून खेळला आणि प्रत्येक मालिकेत धावांचा पाऊस पाडत २००९ साली संघाला विजेतेपद मिळवून दिले त्यानंतर त्याला मुंबई संघाकडून सचिन सोबत खेळण्याची संधी मिळाली. २०१३ च्या आयपीएलमध्ये जेव्हा पॉटिंगने कामगिरीत सातत्य नसल्यामुळे बाहेर बसने पसंत केले तेव्हा रोहितची कर्णधारपदी नेमणूक झाली. कर्णधारपदा बरोबरच त्याच्या कामगिरीतही सुधार आला आणि त्याने मुंबईला पहिल्यांदा चषक जिंकुन दिला. याच कामगिरीच्या जोरावर त्याला इंग्लंड मध्ये झालेल्या २०१३ सालच्या चॅम्पियन स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली पण यांमध्ये त्याला मधल्या फळीतील फलंदाज म्हणून नाही तर सलामीवीर म्हणून. मुरली विजय सारखा सलामीवीर संघात असुन सुद्धा धोनीने रोहितवर विश्वास दाखवला आणि रोहितने धोनीचा विश्वास सार्थ ठरवत संघाला चषक जिंकवण्यात मोलाचा वाटा उचलला.तेव्हापासुन लोक म्हणत असत की "रोहित असलेल्या गुणांचा उपयोग करायला शिकला".

२०१३ ची ऑस्ट्रेलियाविरुद्धची मायदेशातील एकदिवसीय मालिका ज्यात मालिका २-२ बरोबरीत असताना शेवटचा सामना फलंदाजांसाठी अनुकुल असणाऱ्या बंगळुरच्या चिन्नस्वामी मैदानावर होता. मालिकेत मिळवलेल्या दोन्ही विजयात सलामीवीर (रोहित-

धवन) व कोहली यांची भुमिका महत्त्वाची होती. त्यामुळे याही सामन्यात त्यांच्यावर जबाबदारी होता. त्यात पुन्हा एकदा रोहित-धवनने चांगली सलामी दिली आणि मोठ्या धावसंख्येचा पाया रचला त्यानंतर धवन व कोहली झटपट बाद झाले. दोन महत्त्वाचे गडी बाद झाल्यामुळे रोहितवर पूर्णपणे धावसंख्या पुढे नेण्याचा भार आला. पण पाहता पाहता रोहितने २०९ धावा ठोकल्या त्यात १६ उत्तुंग षटकारांचा समावेश होता. यात त्याने एका सामन्यात सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम आपल्या नावे केला. रोहितने मालिकाविराचा किताब पटकावला तसेच एकदिवसीय क्रिकेटमध्ये द्विशतक झळकावलेला जगामध्ये सचिन आणि सेहवाग नंतर तीसरा खेळाडु ठरला त्यात तिघेही भारतीय. द्विशतक झळकावून रोहितने सचिनचा विश्वास सार्थ करुन दाखवला.

२०१४ सालच्या श्रीलंकेविरुद्धच्या मायदेशातील एकदिवसीय मालिकेत दुखापतीमुळे रोहितला सुरुवातीच्या काही सामन्यांना मुकावे लागेल पण तंदरुस्ती सिद्ध करण्यासाठी श्रीलंकेविरुद्धच्या सराव सामन्यात धुवाधार फलंदाजी करुन भारतीय संघात पुनरागमन केले. ईडन गार्डन, कोलकत्ता येथे मालिकेच्या चौथ्या सामन्यात सुरुवात अडखळती होऊन सुद्धा रोहितने जम बसल्यावर त्याने त्याच्या भात्यातील सर्व फटके खेळून फलंदाजीचा आनंद लुटला आणि म्हणता म्हणता त्याने एकदिवसीय क्रिकेटमध्ये स्वत:चे दुसरे द्विशतक झळकावले. यात त्याने २६३ धावा ठोकत एकदिवसीय क्रिकेटमधील सर्वोच्च धावसंख्या नोंदवली तसेच सामन्यात सर्वाधिक चौकार मारण्याचा विक्रम आपल्या नावे केला.याच ईडन गार्डन मैदानावर २०१३ साली रोहितने कसोटीत पर्दापण केले. पर्दापणाच्या सामन्यात त्याने शतकी खेळी केली.

२०१५ मध्ये ऑस्ट्रेलियात झालेल्या तिरंगी मालिकेत ऑस्ट्रेलियाविरुद्ध शतक झळकावले तसेच २०१५ च्या विश्वचषकातील उपउपांत्य सामन्यात बांग्लादेशविरुद्ध १३८ धावांची खेळी करुन भारताला मोठी धावसंख्या उभारुन दिली. त्यानंतर झालेल्या आयपीएल चषकात दुसऱ्यांदा मुंबईला विजेतेपद मिळवून दिले. आफ्रिकेविरुद्ध मायदेशातील मालिकेत टी-२० क्रिकेटमध्ये भारताकडून शतक झळकावण्याचा मान मिळवला तसेच भारताकडून टी-२० मध्ये सर्वोच्च धावा काढल्या तसेच एकदिवसीय मालिकेत १५० धावंची खेळी केली पण ही खेळी भारताला पराभवापासुन वाचवु शकली नाही.

आपल्या दोन द्विशतकी खेळीने मर्यादित षटकांच्या सामन्यातील एक उत्कृष्ट फलंदाजामध्ये रोहितची गणना होऊ लागली.यात अजुन भर म्हणुन २०१६ च्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात सलग दोन सामन्यात शतकी खेळी केल्या तसेच शेवटच्या सामन्यात ९९ धावांची खेळी

केली करत मालिकाविराचा मान मिळवला. आतापर्यंत झालेल्या आयपीएल मध्ये फक्त दोन फलंदाजाना प्रत्येक सत्रात ३०० पेक्षा अधिक धावा करण्यात यश आले त्यात रोहितचा समावेश होतो. ऑस्टेलिया व श्रीलंकेविरूद्धच्या मालिकेनंतर झालेल्या आशिया टी-२० चषकातील पहिल्याच सामन्यात बांगलादेशविरूद्ध ८३ धावांची महत्त्वपुर्ण खेळी केली पण उर्वरित मालिकेत रोहित पुर्णपणे अपयशी ठरला. त्यानंतरच्या टी-२० विश्वचषकात रोहितला एकही अर्धशतक झळकावता आले नाही फक्त उपांत्य सामन्यात ४३ धावांची खेळी करत उत्कृष्ट सुरुवात करून दिली होती. त्यानंतर आयपीएल सत्रात त्याने पाच अर्धशतकांच्या साह्याने ३८३ धावा काढल्या पण तो संघाला अंतिम चार मध्ये स्थान मिळवून देण्यात अपयशी ठरला. वेस्ट इंडिज दौऱ्यात रोहितला फक्त एका सामन्यात खेळण्याची संधी मिळाली त्यात त्याने दोन्ही डावात मिळुन ५० धावा काढल्या त्यानंतर अयोजित झालेल्या टी-२० मालिकेतल्या पहिल्या सामन्यात २४५ धावांचा पाठलाग करताना भारतीय संघ ५ व्या षटकात २ बाद ४८ अशा अवस्थेत होता परंतु त्यानंतर रोहितने राहूलच्या साथीने ७ षटकात ८१ धावांची भागिदारी करत भारताला स्थिरता मिळवून दिली होती त्यात रोहीतने ६९ धावांची खेळी केली होती पण भारतीय संघाला १ धावाने पराभव स्विकारावा लागला होता.

न्युझिलंडविरूद्धच्या मालिकेतील तीनही सामन्यात रोहीतला खेळण्याची संधी मिळाली त्यातील पाच डावांत तीन अर्धशतकांच्या साह्याने २४० धावा फटकावल्या कसोटी मालिकेतनंतर झालेल्या एकदिवसीय मालिकेतील पहिल्या चार सामन्यात रोहितने १४, १५, १३ व ११ धावा काढल्या पण शेवटच्या सामन्यात ७० धावांची खेळी करताना दुखापतग्रस्त झाला त्यामुळे त्याचा इंग्लंडविरूद्धच्या मालिकेतसाठी संघातही समावेश झाला नाही बांगलादेश किंवा ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या मालिकेत तो पुनरागमन करू शकतो. रोहितला कसोटीसंघातले स्थान राखायचे असेल तर आतापर्यंतच्या परदेशदौऱ्यातील कामगिरी विसरुन पुढे जावे लागेल आणि तसेच भारताचा नवा कर्णधार हा परदेशात पाच गोलंदाज घेऊन खेळेल त्यामुळे स्वत:ची जागा कायम राखायची असेल तर कामगिरी सुधारणा आवश्यक आहे.

# अजिंक्य रहाणे

सध्याच्या भारतीय कसोटी संघातील एक भरवशाचा खेळाडु. युवा कसोटी संघाचा अविभाज्य घटक आणि उपकर्णधार. ज्याप्रकारे सुरुवातीच्या काळात संघात कमीत कमी ५-६ खेळाडु हे मुंबईचे असायचे ज्यात सुनील गावसकर, संदिप पाटील, रवी शास्त्री, अंशुमन गायकवाड, दिलीप वेंगसरकर, संजय मांजरेकर, सचिन तेंडुलकर, विनोद कांबळी, अजित आगरकर, वासिम जाफर आणि आता रोहित शर्मा व अजिंक्य रहाणे मुंबईच नाव पुढं नेत आहेत. मध्यंतरीच्या काळात फक्त सचिन तेंडुलकर मुंबईचा एकमेव खेळाडु भारताच प्रतिनिधित्व करत होता. सचिनच्या क्रिकेट कारकिर्दीच्या शेवटच्या सामन्यांमध्ये अजिंक्यला पदापर्णाची संधी मिळाली. अजिंक्यने ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटीत पदार्पण केले तर इंग्लंडविरुद्ध एकदिवसीय व टी-२० मध्ये पदापर्ण केले. अजिंक्यने सातत्याने देशांतर्गत स्पर्धांमध्ये खोऱ्याने धावा काढल्या. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पाच हजारापेक्षा जास्त धावा काढत मुंबई संघाचा महत्त्वाचा खेळाडु बनला.



अजिंक्यच्या कारकिर्दीला कलाटणी देणारा क्षण म्हणजे राहुल द्रविडच्या नेतृत्वाखाली राजस्थानसाठी आयपीएल मध्ये खेळण्याची संधी भेटली आणि सलग ३-४ वर्षे सलामीला येऊन द्रविडचा निर्णय सार्थ ठरविला आणि विश्वास जिंकला. राजस्थानसाठी केलेली कामगिरी ती फलंदाजीत असो वा क्षेत्ररक्षणात स्वत:ला पुर्णपणे झोकुन देऊन संघाला अनेक विजय मिळवून  दिले. २०१३ चा पदार्पणाचा सामना आणि त्यानंतर २०१५ ची आफ्रिकेविरुद्धची मालिका फक्त अजिंक्यने मायदेशात खेळल्या. या दोन वर्षांत त्याने दक्षिण आफ्रिका, न्युझिलंड, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, बांग्लादेश आणि श्रीलंका या तगड्या संघांविरुद्ध त्यांच्याच देशात नेटाने फलंदाजी केली. जिथे पुजारा, विजय, धवन, रोहित यांच धावा काढण्यात सातत्य नसताना अजिंक्यने भारताला तारले आणि स्टेन, मॉर्केल,जॉनसन, स्टार्क यांना सडेतोड उत्तर दिले.

अजिंक्य रहाणेच्या छोट्याश्या कारकिर्दीमध्ये त्याने कसोटी सामन्यात न्युझिलंडविरुद्ध झळकावलेले पहिले शतक तसेच आफ्रिकेत केलेली ९६ धावांची खेळी सामना जिंकवण्यात जरी यशस्वी ठरली नसली तरी संघाच मनोधर्ये उंचवणारी नक्कीच होती आणि भारताला अजिंक्यच्या रुपाने मधल्या फळीतील फलंदाज गवसला जो परदेशी खेळपट्यांवर उत्तम प्रकारे खेळु शकतो. त्यानंतर एका मागे एक इंग्लंड दौरा, मायदेशातील एकदिवसीय मालिका आणि त्यानंतरचा मोठा ऑस्ट्रेलिया दौरा. इंग्लंड दौऱ्यात लॉर्डसवर झालेल्या कसोटी सामन्यात एक अविश्वसनिय खेळी करुन अजिंक्यने विजयात मोलाचा वाटा उचलला आणि भारताचे लॉर्डसवर कसोटी विजयाचे स्वप्न पुर्ण केले. त्याला साथ दिली ती इशांत शर्माने. ज्या ज्या वेळेस या विजयाची आठवण काढली जाईल त्या त्या वेळेस अजिंक्यच नाव "सामन्याचा हिरो" म्हणुन काढले जाईल. ज्या ऐतिहासिक लॉर्डस मैदानावर क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकरला आपल्या २४ वर्षांच्या कारकिर्दीतमध्ये अपयश आले तिथे अजिंक्यने आपल्या कसोटी कारकिर्दीतल्या सुरुवातीलाच लॉर्डसवर शतक झळकावले.

भारतीय युवा संघाला परदेशीभुमीवर फक्त कसोटीसामन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर अपयश आले पण एकदिवसीय सामन्यामध्ये युवा भारतीय संघ कोणत्याही संघाला सामोरा जाऊ शकतो हे २०१४ ची इंग्लंडमधील एकदिवसीय़ मालिका जिंकुन दाखवून  दिले. रोहित शर्मा दुखापतग्रस्त असल्याने अजिंक्यला सलामीला यावे लागले आणि मिळालेल्या संधीचा त्याने पुरेपुर फायदा घेत पहिले शतक झळकावले आणि धवन सोबत मोठी भागिदारी करत भारताला मोठा विजय मिळवून  देत मालिकाही जिंकुन दिली. श्रीलंकेविरुद्धच्या

मालिकेत पुन्हा एकदा अजिंक्यची बॅट तळपली आणि पहिल्याच सामन्यात धवन सोबत पहिल्या गड्यासाठी २३१ धावांची भागिदारी करत दुसरे शतक झळकावले व भारताला मोठी धावसंख्या उभारण्यास मदत केली.

श्रीलंकेविरुद्धची मालिका जिंकल्यानंतर भारताच्या युवा संघासाठी एक खडतर दौरा होता ऑस्ट्रेलियाचा ज्यात चार कसोटी सामने, तिरंगी मालिका आणि त्यानंतर होणारी २०१५ ची विश्वचषक स्पर्धा. पहिल्या दोन सामन्यात भारताचा पराभव झाला, तीसऱ्या सामन्यात अजिंक्यने कोहलीसोबत चौथ्या गड्यासाठी २६२ धावांची महत्त्वाची भागिदारी करत भारताला मोठी भावसंख्या उभारुन दिली आणि परदेशातील कामगिरी करण्याची मालिका सुरुच ठेवली परंतु त्याला तिरंगी मालिकेत अपयश आले. आपल्या कारकिर्दीतल्या पहिल्या वहिल्या विश्वचषकाच्या पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात अजिंक्यला अपयश आले पण याची भरपाई त्याने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात तडाखेबाज अर्धशतकी खेळी खेळन भारताला मोठी धावसंख्या उभारण्यात केली आणि विजयात महत्त्वाचा वाटा उचलला. ऑस्ट्रेलियातल्या मोठ्या मैदानावर क्षेत्ररक्षणातही त्याने कोहली व जडेजाच्या साथीने अनेक धावा रोखण्यात मदत केली.

विश्वचषकाच्या उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून हार पत्कारल्यानंतर भारताला बांग्लादेशमध्ये एकदिवसीय मालिका खेळायची होती व या मालिकेत काही खेळाडुंना विश्रांती देऊन नवीन खेळाडुंना संधी मिळण्याची आशा होती पण विश्वचषकात सहभागी झालेला संघच कायम ठेवण्यात आला. कारण काही दिवसांपुर्वी त्यांनी पाकिस्तानचा ३-० ने धुव्वा उडवला होता. पहिल्या सामन्यात रहाणेला साजेशी कामगिरी करण्यात अपयश आले त्यामुळे पुढील दोन्ही सामन्यात त्याला बाहेर बसावे लागले. याबाबत धोनीने सांगितले कू त्याला भारतीय उपखंडात स्ट्राईक रोटेट करण्यात अपयश येते. परंतु परदेशातल्या आपल्या कामगिरीने सर्वांना मोहित करुन टाकल्यानंतर एका सामन्यातल्या कामगिरीवरुन बाहेर बसावे लागले.

काही दिवसांनंतरच निवडकर्त्यांनी त्याला कर्णधार म्हणून झिम्बाब्वे दौऱ्यासाठी निवड करुन सगळयानाच उत्तर दिले. कर्णधार म्हणून खेळलेल्या आपल्या पहिल्याच दौऱ्यात एकदिवसीय मालिका ३-० ने जिंकली तर टी-२० मालिका १-१ ने बरोबरीत राखली.धोनीच्या कसोटीतून निवृत्ती घेतल्यानंतर रहाणेला कसोटी संघाचा उपकर्णधारपदी निवडण्यात आले. श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात ८ झेल घेऊन यष्टीरक्षका व्यतिरिक्त

एका सामन्यात ८ झेल घेऊन विक्रम प्रस्थापित केला त्याच बरोबर कोलंबोमध्ये झालेल्या दुसऱ्या सामन्यातील दुसऱ्या डावात शानदार शतक झळकावून  भारताला मोठी आघाडी मिळवून  दिली आणि यामुळे भारताने मोठा विजय मिळवून  मालिकेत बरोबरी साधली.श्रीलंकेनंतर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मायदेशात झालेल्या एकदिवसीय मालिकेत ३ अर्धशतके झळकावली पण त्यानंतरच्या कसोटी मलिकेतील पहिल्या तीन सामन्यात एक अर्धशतक सुद्धा झळकावता आले नाही याची भरपाई त्याने फिरोजशाह कोटला येथे झालेल्या शेवटच्या सामन्यात दोन्ही डावात शतक झळकावून  केली. त्याच्या कामगिरीचे बक्षिस म्हणून यावर्षी त्याला "अर्जुन पुरस्काराने" गोरविण्यात आले.

२०१६ च्या ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या एकदिवसीय मालिकेत चौथ्या क्रमांकावर येत ४ सामन्यात दोन अर्धशतकांसह १४१ धावा काढल्या तर दुखापतीमुळे पाचव्या सामन्यांत त्याला संघाबाहेर बसावे लागले तर युवराज व रैनाचा टी-२० च्या संघात समावेश झाल्याने रहाणेला आंतिम अकरा मध्ये संधी मिळाली नाही. २०१६ च्या आयपीएल मोसमात रहाणेने नवीन तयार झालेल्या रायझिंग पुणे सुपरजायंट्सचे प्रतिनिधीत्व केले. या सत्रात त्याने पाच अर्धशतकांच्या मदतीने ३४३ धावा केल्या ते ४९ च्या सरासरीने. रहाणेनी त्याच्या कारकिर्दीतील आजपर्यंतच्या सर्व परदेश दौऱ्यात कौतुकास पात्र कामगिरी केली असल्याने वेस्ट इंडिज दौऱ्यात सुद्धा त्याच्या कडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती त्याप्रमाणे त्याने ३ सामन्यांतील ४ डावांत एक शतक आणि एक अर्धशतकाच्या मदतीने २४३ धावा काढल्या व परदेशातील आपल्या कामगिरीतील सातत्य कायम राखले.

न्युझिलंडविरूध्दच्या मालिकेतील पहिल्या दोन सामन्यांत एक अर्धशतकासह १३६ धावा काढल्या पण त्यांने आपला जलवा दाखवला तो तीसऱ्या व अंतिम सामन्यात त्यात त्याने १८८ धावांची धडाकेबाज खेळी केली व विराट कोहली सोबत १६५ धावांची भागीदारी करत भारताला पहिल्या डावात मोठी धावसंख्या उभारुन दिली आणि भारताने ३-० ने मालिका जिंकली परंतु कसोटी मालिकेसारखा प्रभाव त्याला एकदिवसीय मालिकेत पाडता आला नाही आणि पाच सामन्यात फक्त एका अर्धशतका सह १४३ धावा काढल्या. रहाणेची कसोटीतील कामगिरी वरचेवर वेगळी पातळी गाठत होती पण कसोटीप्रमाणे एकदिवसीय सामन्यात कामगिरी करण्यात त्याला यश येत नव्हते तसेच इंग्लंड विरूद्धच्या कसोटीमालिकेतील पहिल्या तीन सामन्यात तर ३० चा आकडाही पार करता आला नाही व

दुखापतीने त्याला उर्वरित दोन सामन्यांना मुकावे लागले लवकरात लवकर तो संघात परतेल अशी आशा आहे.

ज्याप्रकारे अजिंक्यने परदेशातल्या कामगिरीने क्रिकेटप्रमींना मोहुन टाकले त्याचप्रकारे घरच्या प्रेक्षकांसमोर सुद्धा तो त्याचप्रकारे कामगिरी करेल अशी आशा आहे. जेव्हा एकदिवसीय संघाच्या अंतिम ११ मध्ये रहाणेला बाहेर बसावे लागते तेव्हा तो क्रिकेट राजकारणाचा बळी ठरतो का? असे वाटते. एक दोन सामन्यांत स्ट्राईक रोटेट करण्यात अपयश आल्यानंतर हा खेळाडु उपखंडात एकदिवसीय सामन्यामध्ये चांगली कामगिरी करुच शकत नाही ही गोष्ट चुकिची आहे. कारण त्याची देशांतर्गत तसेच परदेश दौऱ्यातील कामगिरी यामुळे अजिंक्य रहाणे सारख्या फलंदाजाला व उत्कृष्ट क्षेत्ररक्षकाला अंतिम ११ मध्ये संधी न देणे म्हणजे सामना खेळण्यापुर्वीच संघाला भगदाड पडण्यासारखे आहे.

## शिखर धवन

सेहवाग,गंभीर सोबतच दिल्लीचा आणखी एक आघाडीचा फलंदाज. आपल्या ताबडतोड फलंदाजीने त्याने सर्वांचे लक्ष वेधले.धवनचे पहिल्यांदा नाव आले ते २००४ मध्ये बांग्लादेशमध्ये झालेल्या १९ वर्षांखालील विश्वचषकात ज्यात त्याने ५०५ धावा फटकवल्या आणि भारताला अंतिम फेरीत धडक मारुन दिली. भारताला अंतिम फेरीत पराभव स्विकारावा लागला पण तो मालिकावीराचा मानकरी ठरला.तसेच तो देशांतर्गत स्पर्धांमध्ये खोऱ्याने धावा काढत होता.आयपीएलच्या सुरुवातीच्या वर्षात त्याला सेहवाग,गंभीरसोबत दिल्ली डेयरडेव्हिल्सचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली यात त्याने भरपुर धावा केल्या.



त्याला आंतरराष्ट्रीय संघात संधी मिळाली ती २०१० साली ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत.पदार्पणात कामगिरी करता आली नाही पण त्याने देशांतर्गत स्पर्धात जोमाने कामगिरी केली या कामगिरीचे बक्षिस म्हणून त्याला सलामीवीर म्हणून संधी मिळाली ती २०११ च्या वेस्ट इंडिज दौऱ्यात त्यात त्याला फक्त एका अर्धशतकाच्या मदतीने ५८ धावा करता आल्या आणि पुन्हा संघाबाहेर व्हावे लागले. परंतु त्याची देशांतर्गत स्पर्धेतील कामगिरी आणि सेहवाग व गंभारची अपयशी मालिका बघता त्याला पुन्हा संधी मिळण्याची आशी होती.

२०१३ च्या रणजी ट्रॉफी तसेच इराणी ट्रॉफीतल्या कामगिरीच्या जोरावर सेहवागच्या जागी त्याला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या शेवटच्या दोन कसोटी सामन्यासाठी संघात समावेश करण्यात आला.पदार्पणाच्या कसोटी सामन्यात त्याने १८७ धावा केल्याआणि भारताला पहिल्या डावात मोठी आघाडी घेऊन विजय मिळवण्यात महत्त्वाची भुमिका बजावली.पण क्षेत्ररक्षण करताना झालेल्या दुखापतीने त्याला दुसऱ्या डावात फलंदाजी करता आली नाही व शेवटच्या कसोटीला मुकावे लागले.धवनने आयपीएल मध्ये दिल्ली,मुंबई तसेच सध्या हैद्राबादचा कर्णधार म्हणून नेतृत्व केले आहे.२०१२ च्या स्पर्धेत त्याने हैद्राबादकडून सर्वाधिक धावा केल्या होत्या.

२०१३ ची चॅम्पियन ट्रॉफी,धवनला पुन्हा एकदा एकदिवसीय संघात स्थान मिळाले. या स्पर्धेत नवीन सलामी जोडी उतरवली ती म्हणजे धवन आणि रोहित शर्मा.या स्पर्धेत या सलामी जोडीने पाच सामन्यात दोन शतकी व दोन अर्धशतकी सलामी भागीदारी केल्या.तसेच धवनने या स्पर्धेत दोन शतके व एका अर्धशतकाच्या मदतीने सर्वाधिक धावा केल्या. त्यानंतरही धवनची बॅट तळपतच राहिली. २०१३ सालची मायदेशातील ऑस्ट्रेलियाविरुद्धची मालिका भारताच्या पहिल्या तीन फलंदाजांनीच गाजवली यात धवनने एक शतक आणि दोन अर्धशतके झळकावली.

धवनने जसे एकदिवसीय सामन्यात सातत्य राखले तसे त्याला कसोटीत राखता आले नाही. इंग्लंड दौऱ्यात ६ डावात त्याला फक्त ३७ धावा करण्यात यश आले. त्यामुळे त्याला उर्वरीत सामन्यात बाहेर बसावे लागले. श्रीलंकेविरुद्धच्या मायदेशातील एकदिवसीय मालिकेत सातत्य राखत एका शतकासह दोन अर्धशतके झळकावली. विश्वचषकापुर्वी ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या कसोटी मालिकेत धवनला पुन्हा एकदा अपयश आले आणि त्याच्या जागी के एल

राहुलला संधी देण्यात आली. कसोटीतील अपयश विसरुन त्याने २०१५ च्या विश्वचषकात भारताकडून सर्वाधिक धावा काढण्याचा मान मिळवला.

विश्वचषकानंतर झालेल्या बांग्लादेशदौऱ्यात त्याने कसोटीत १७३ धावांची खेळी केली तसेच श्रीलंकेत झालेल्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात शतक झळकावले. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत त्याला एकही अर्धशतक झळकावता आले नाही. २०१६ च्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील एकदिवसीय मालिकेत धवन पहिल्या दोन सामन्यात अनुक्रमे ९ व ६ धावा काढता आल्या पण पुढील तीन सामन्यांत त्याने १ शतक व २ अर्धशतक झळकावले. चौथ्या सामन्यात १२६ धावांची खेळी करत कोहलीसोबत दुसऱ्या गड्यासाठी २१२ धावांची भागिदारी केली पण त्यानंतर बाकीच्या फलंदाजांच्या अपयशामुळे भारताला २५ धावांनी पराभव स्विकारावा लागला. एकदिवसीय मालिकेनंतरच्या टी-२० मालिकेत धवन एकदिवसीय मालिकेतल्या कामगिरीची पुनरावृत्ती करण्यात अपयशी ठरला. तसेच त्यानंतरच्या श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेत ५१ व नाबाद ४६ धावांची खेळी करत मालिका विजयात महत्त्वाची भुमिका पार पाडली तर आशिया चषकाच्या बांग्लादेशाविरुद्धच्या अंतिम सामन्यात ६० धावांची खेळी केली.

आशिया चषकानंतर भारतात झालेल्या टी-२० विश्वचषकात धवन पुर्णपणे अपयशी ठरला त्यामुळेच वेस्ट इंडिजविरुद्धच्या उपांत्य सामन्यात धवनच्या जागी रहाणेला संधी मिळाली. तर वेस्टइंडिज दौऱ्यातील पहिल्या सामन्यातील ८४ धावा सोडल्यास धवन २० धावांचा टप्पाही गाठु शकला नाही. त्यानंतर न्युझिलंडविरुद्धच्या कसोटी संघात धवनचा समावेश होता पण त्याच्या जागी राहुलला संधी दिली परंतु दुसऱ्या सामन्यापुर्वी राहुल दुखापतग्रस्त झाल्याने धवन दुसऱ्या कसोटीत खेळला त्यात तो अपयशी ठरला आणि स्वत: दुखापतग्रस्त झाला व उर्वरीत मालिका आणि इंग्लंडविरुद्धच्या मालिकेला मुकावे लागले. सद्यस्थितीत भारताकडे एकदिवसीय सामन्यांसाठी रोह्त शर्मा, राहुल, रहाणे तर कसोटीसाठी विजय, राहुल आणि गरज पडल्यास पुजाराही सलामीला खेळु शकतो त्यामुळे धवनला जर येणाऱ्या ऑस्ट्रेलिया, बांग्लादेशविरुद्धच्या आणि त्यानंतर चॅम्पियन ट्रॉफीच्या संघात स्थान मिळवायचे असेल तर त्याला कामगिरीसोबतच तंदरुस्तीवर सुद्धा लक्ष द्यावे लागेल.आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये त्याला आयपीएल सारखी कामगिरी करता आली नाही. सद्य स्थितीत भारताकडे कसोटीसाठी सलामी खेळाडु आहेत त्यामुळे धवनला जर कसोटी संघात स्थान टिकवायचे असेल तर कसोटीतील कामगिरी सुधारावी लागेल.

# सुरेश रैना

सुरेश रैना क्रिकेट जगतात आपल्या चपळ क्षेत्ररक्षणाने झळकलेले एक नाव. उत्तर प्रदेशातील मुरादानगरमध्ये जन्मलेल्या रैनाने आपल्या चपळ क्षेत्ररक्षण व फलंदाजीने सर्वांना मोहून टाकले. रैनाने रणजीत उत्तर प्रदेशचे तसेच भारताच्या युवा संघाचे नेतृत्व केले आहे. त्याचबरोबर चेन्नई सुपरकिंगसाठी रैनाने केलेली कामगिरी अनोखी आहे. रैनाने युवराज सिंग, महम्मद कैफ तसेच सध्याच्या जडेजा, रहाने व कोहलीच्या साथीने आपल्या चपळ क्षेत्ररक्षणाने अनेक धावा रोखल्या तसेच अप्रतिम झेल घेतले.




भारताच्या युवा (१९ वर्षांखालील) संघासमवेत केलेल्या कामगिरीच्या जोरावर भारतीय संघात समावेश करण्यात आला. आपल्या पदार्पणाच्या सत्रात रैनाला हवी तशी

कामगिरी करण्यात अपयश आले. रैनाच्या अपयशी कामगिरीमुळे त्याला संघाबाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. २००६ सालच्या अपयशी कामगिरीनंतर संघाबाहेर गेल्यानंतर रैनाला दुखापतीने ग्रासले. दुखापतीतून बाहेर आल्यानंतर त्याने आपली कामगिरी सुधारण्यावर भर दिला. २००८ साली सुरु झालेली आयपीएल रैनासाठी आशेचा किरण ठरला. रैनाची चेन्नई सुपरकिंग संघात निवड करण्यात आली आणि त्याला भारतीय संघाच्या कर्णधाराच्या नेतृत्वात खेळण्याची संधी मिळाली.रैनाची आयपीएलमधल्या कामगिरीच्या जोरावर स्पर्धेच्या यशस्वी फलंदाजामध्ये ओळख आहे. त्याला आयपीएलच्या सलग सात सत्रात ४०० पेक्षा जास्त धावा करण्यात यश आले हीच कामगिरी रैनाला भारतीय संघात परत येण्यात महत्त्वाची ठरली. रैनाने आपल्या कामगिरीच्या जोरावर चेन्नई सुपरकिंगला आयपीएल चषक व चॅंपियन लिग तसेच जिंकण्यात तसेच क्रिकेटविश्वात एक यशस्वी टी-२० संघ म्हणून नावारूपास आणले. भारतीय संघात पुन्हा मिळालेली संधी रैना दोन्ही हातांनी मिळालेल्या संधीचा फायदा उठवण्याच्या तयारीत होता.

संघात सचिन तेंडूलकर, गौतम गंभीर, सेहवाग, युवराज असताना रैनाकडे मधल्या व खालच्या क्रमांकावरील फलंदाजातील दूवा म्हणून पाहिले जात या संधीचा रैनाने पूर्णपणे फायदा घेतला. तसेच धोनीच्या साथीने व युवराजच्या साथीने रैनाने भारताला सामने जिंकून दिले. या कामगिरीच्या जोरावर रैनाची भारताच्या २०११ च्या विश्वचषक संघात निवड करण्यात आली.विश्वचषकच्या सुरुवातीच्या काही सामन्यात रैनाला संघाबाहेर बसावे लागले परंतु युसुफ पठाणची अयशस्वी कामगिरी रैनाला अंतिम ११ मध्ये संधी मिळण्यास उपयोगी ठरली. या विश्वचषकत रैनाने उपउपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियाविरूद्ध केलेलीनाबाद ३४ धावांची खेळी तसेच उपांत्य सामन्यात पाकिस्तानविरूद्ध महत्त्वाच्या क्षणी केलेली नाबाद ३६ धावांची खेळी भारताला मोठी धावसंख्या उभारण्यात मोलाची ठरली आणि भारताला विश्वचषक जिंकवण्यात मोलाची कामगिरी केली.

रैनाकडे एकदिवसीय व टी-२० खेळाडू म्हणून पाहिले जाते पण रैनाने आपल्या कामगिरीच्या जोरावर कसोटी संघात स्थान मिळविले व आपल्या पदार्पणाच्या कसोटीत श्रीलंकेविरूद्ध शतक झळकावले पण रैनाला एकदिवसीय व टी-२० इतके यश कसोटीत मिळविण्यात अपयश आले आणि त्याला संघाबाहेर रहावे लागले. टी-२० मध्ये भारताकडून पहिले शतक झळकावण्याचा विक्रम रैनाच्याच नावावर आहे हे शतक रैनाने दक्षिण आफ्रिकेविरूद्ध २०१० मध्ये वेस्ट इंडिजमध्ये झालेल्या टी-२० विश्वचषकत झळकावले. रैनाची ओळखही मर्यादीत षटकांच्या सामन्यातील एक उत्कृष्ट फलंदाज तसेच एक पर्यायी ऑफ स्पिन

गोलंदाजीसुद्धा कर्णधाराला एक उपाय देतो. सध्या रैना भारतीय संघासाठी स्लिप मध्ये उत्कृष्ट क्षेत्ररक्षण झेल पकडणे, धावा रोखणे आणि थेट फेकीने फलंदाज बाद करण्यात महत्त्वाची भुमिका पार पाडतो.

रैनाने २०१४ साली इंग्लंडविरूद्ध ७५ चेंडूत झळकावलेले शतक हे रैनाने त्याच्या कमकुवत गोष्टींवर काम करुन आपल्या आत्मसात करुन कमकुवत गोष्टींना जमेची बाजू बनवली. २०१५ च्या विश्वचषकत रैना भारतासाठी महत्त्वाचा खेळाडू होता. रैनाने झिम्बावेविरूद्ध झळकावलेले शतक जेव्हा भारताचे चार गडी बाद झाल्यानंतर भारत अडचणीत सापडला होता आणि भारताला अजुन मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करायचा होता, रैनाने धोनीच्या साथीने भारताला विजय मिळवून दिला.विश्वचषकात २८४ धावां काढत प्रभावी कामगिरी केल्यानंतर बांग्लादेशविरुद्धच्या मालिकेत छोट्या खेळी करत ११२ धावा फटकावल्या पण तो भारताला मालिका पराभवापासुन वाचवु शकला नाही. २०१५ आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० व एकदिवसीय मालिकेत रैना पुर्णपणे अपयशी ठरला. ५ सामन्यांपैकी ३ सामन्यांत तर त्याना दुहेरी धावसंख्याही गाठता आली नाही. चौथ्या सामन्यांत त्याने ५३ धावांची खेळी केली पण त्यानंतरच्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० मालिकेत ४१ व नाबाद ४९ धावांची खेळी करत भारताला ३-० ने विजय मिळवण्यात महत्त्वाची भुमिका पार पाडली पण त्यानंतरच्या श्रीलंका, आशिया चषक व टी-२० विश्वचषकात धावा काढण्यात तो अपयशी ठरला पण गोलंदाजीत आपले योगदान देत होता.

आयपीएलची सुरुवात झाल्यापासुन रैना धोनीच्या नेतृत्वातील चेन्नई सुपरकिंगचे सलग ८ वर्षे प्रतिनिधित्व करत होता. पण २०१६ मध्ये आयपीएलमध्ये नव्याने सामील झालेल्या गुजरात लायन्सच्या कर्णधारपदाची धुरा सोपवण्यात आली त्यात त्याने संघाला अंतिम चार संघात स्थान मिळवून दिले पण त्याच्या संघाला उपांत्य फेरीत पराभव स्विकारावा लागला. न्युझिलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी त्याची संघात निवड झाली होती पण सरावा दरम्यान दुखापतग्रस्त झाल्याने त्याला एकही सामना खेळता आला नाही आणि त्याच्या जागी मिळालेल्या संधीचा केदार जाधवने पुरेपुर फायदा उठवत अष्टपैलु कामगिरी केली. त्यामुळे एखाद्या दुखापतीमुळे रैनाला एकदिवसीय सामन्यांतल स्थान गमवाव लागु नये हिच एक इच्छा. तसेच इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेच्या संघातही त्याचा समावेश न झाल्याने त्याची चॅम्पियन ट्रॉफीच्या संघात समावेश होण्याची शक्यता कमीच आहे.सद्यस्थितीत भारताकडे मधल्या फळीत खेळणारे अनेक पर्याय उपलब्ध आहेत त्यामुळे रैनाला कामगिरीत सातत्य ठेऊन फलंदाजीने भारताला सामने जिंकुन द्यावे लागतील.

## रविचंद्रन अश्विन

आर अश्विन सध्याच्या भारतीय संघातील एक महत्त्वाचा आणि भरवशाचा एकमेव गोलंदाज.भारतीय क्रिकेट मध्ये आजपर्यंत बिशनसिंग बेदी,लक्षमण शिवरामणकृषणन, यांसारख्या फिरकी गोलंदाजांनी आपले नाव कमावले. अनिल कुंबळे निवृत्ती झाला तसेच हरभजन सिंग त्याच्या कारकिर्दीच्या शेवटच्या टप्प्यात असताना त्यांनी इतके वर्षे जी कामगिरी केली भारताला अनेक सामने जिंकवण्यात महत्त्वाची भुमिका निभावली. कुंबळे व हरभजन नंतर कोण? या प्रश्नाच उत्तर आर अश्विनने दिले. प्रग्यान ओझा, अमित मिश्रा, रमेश पोवार, पीयुष चावला यांनी भारतीय संघात फिरकी गोलंदाजीचे नेतृत्व केले पण त्यांना कामगिरीत सातत्य राखता न आल्यामुळे त्यांना संघातून आत बाहेर व्हावे लागले. परंतु अश्विनच्या समावेशाने संघाला स्थिरता मिळून दिली.



पेशाने अभियंता असलेल्या तामिळनाडुच्या या खेळाडुने सलामीचा फलंदाज म्हणुन क्रिकेट कारकिर्दीची सुरुवात झाली आणि त्याला त्यात काही प्रमाणात यशही मिळाले. त्यानंतर अश्विन खालच्या क्रमांकावर फलंदाजीस येऊ लागला आणि त्याने ऑफ स्पिन गोलंदाजीवर लक्ष केंद्रित केले. २००६ साली त्याने तामिळनाडु कडून खेळताना प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले नंतर त्याने संघाचे नेतृत्व सुद्धा केले. २००९ मध्ये अश्विनचा आयपीएलच्या चेन्नई सुपर किंग संघात समावेश करण्यात आला पण २०१० च्या आयपीएल मोसमात अश्विनने आपला जलवा दाखवला आणि याच कामगिरीच्या जोरावर पहिल्यांदा त्याचा भारतीय संघात समावेश करण्यात आला. त्याचवर्षी दक्षिण आफ्रिकेत झालेल्या चॅम्पियन लिग टी-२० मध्ये सर्वाधिक बळी बाद करत मालिकावीराचा पुरस्कार मिळवला. त्याचबरोबर २०११ साली भारताने जिंकलेल्या विश्वचषकाचा सदस्य होता परंतु या विश्वचषकात त्याला फक्त दोन सामने खेळण्याची संधी मिळाली.

२०११ च्या विश्वचषकानंतर अश्विनला वेस्ट इंडिजविरुद्ध कसोटी पदार्पणाची संधी मिळाली या मालिकेत त्याने दोनदा पाच गडी बाद केले आणि फलंदाजीत शतक झळकावत मालिकावीराचा पुरस्कार मिळवला. भारतीय उपखंडात अश्विनची कामगिरी वेळेनुरुप सुधारत होती पण २०११ च्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात मालिकेत तसेच २०१२ साली इंग्लंडविरुद्ध मायदेशात झालेल्या मालिकेत अश्विन सपशेल अपयशी ठरला. हे अपयश विसरुन २०१३ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध मायदेशात झालेल्या मालिकेत अश्विनने ऑस्ट्रेलियन फलंदाजांना सळो की पळो करुन सोडत २९ गडी बाद केले आणि भारताकडून चार सामन्यांच्या कसोटी मालिकेत सर्वाधिक बळी घेण्याचा पराक्रम केला. याच वर्षी त्याने १०० बळींचा टप्पा पार केला ते फक्त १८ सामन्यांत. यासोबतच त्याने भारताकडून सर्वात कमी सामन्यात १०० गडी बाद करण्याचा विक्रम आपल्या नावे केला यापुर्वी हा विक्रम इरापल्ली प्रसन्ना यांच्यानावे होता तो टप्पा त्यांनी २० सामन्यांत पार केला होता.

२०१४ च्या टी-२० विश्वचषकात भारताला अंतिम सामन्यांत धडक मारण्यात विराट कोहली सोबतच अश्विनचा मोलाचा वाटा होता. याच स्पर्धेत त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध ११ धावांत ४ गडी बाद करत ऑस्ट्रेलियाला ८६ धावांत गुंडाळले. उपांत्य सामन्यांत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळताना हाशिम अमलाला त्रिफळाचीत केले. ज्या चेंडूवर अमला बाद झाला तो या दशकातील एक अप्रतिम चेंडू होता. २०१४ च्या इंग्लंड दौऱ्यात अश्विनला पहिल्या तीन कसोटी सामन्यात बाहेर बसावे लागले त्यानंतरच्या दोन सामन्यांत त्याचा संघात समावेश झाला पण त्याला हवी तशी कामगिरी करता आली नाही. त्यानंतर झालेल्या ऑस्ट्रेलिया

दौऱ्यात सुद्धा त्याला पहिल्या कसोटी सामन्यात संघाबाहेर बसावे लागले. त्यानंतर झालेल्या २०१५ च्या विश्वचषकात त्याने १३ बळी मिळवत भारतासाठी शमीनंतर महत्त्वाचा गोलंदाज ठरला.

२०१५मध्ये श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेत भारताने २-१ ने विजय मिळवला त्यात त्याने २१ गडी बाद केले आणि मालिकाविराचा मान मिळवला. नोव्हेंबर २०१५ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळताना सर्वात जलद १५० बळींचा टप्पा पार करणारा भारतीय ठरला.. याच मालिकेत त्याने हाशिम अमला, ए बी डिव्हीलियर्स, फाफ डुप्लेसिस यांसारख्या जागतिक दर्जाच्या खेळाडुंना आपल्या चेंडूनी बकरा बनवत ३१ बळी मिळवत पुन्हा एकदा मालिकाविराचा पुरस्कार पटकावला आणि भारताला ३-० ने एकहाती विजय मिळवून दिला.

अश्विनला परदेशात आतापर्यंत भारतीय उपखंडात केलेल्या कामगिरी सारखा प्रभाव पाडता आला नाही पण याला अपवाद ठरला तो २०१६ चा वेस्ट इंडिजचा दौरा. या दौऱ्यात त्याने दोन शतकांसह २३५ धावा फटकावल्या त्या सोबतच गोलंदाजीत १७ गडी सुद्धा बाद केले. या अष्टपैलु कामगिरीमुळे त्याने मालिकावीर पुरस्काराला गवसणी घातली. यातील त्याने सेंट ल्युसिया येथे खेळलेल्या तीसऱ्या कसोटीत अडचणीत केलेल्या शतकी खेळीचे महत्त्व खुप होते. भारतीय संघ ५ बाद १२६ असा अडचणीत होता तेव्हा त्याने यष्टिरक्षक वृद्धिमान साहा सोबत केलेल्या २३५ धावंच्या भागिदारीने भारताला मोठी धावसंख्या उभारुन दिली.

अश्विनची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्याची गोलंदाजीतली विविधता यात त्याने नैसर्गिक ऑफ स्पिन सोबतच त्याने कॅरम बॉल व आर्म बॉल करण्याची शैली आत्मसात केली यातील त्याच्या कॅरम बॉलला त्याला मोठ्या प्रमाणात यश मिळाले त्या चेंडूने तर ए बी डिव्हीलियर्सला सुद्धा चकवा दिला. काही वेळातर त्याने लेग ब्रेक गोलंदाजी सुद्धा केली.अश्विनने आपल्या मायदेशातील कामगिरीत सातत्य राखत न्युझिलंडविरुद्ध २७ बळी पटकावले या कामगिरीच्या जोरावर त्याने भारताला ३-० ने विजय मिळवून देत सातवा मालिकावीर पुरस्कारावर आपला कब्जा केला. याच मालिकेत तो भारताकडून सर्वात जलद तर क्रिकेट विश्वात दुसरा सर्वात जलद २०० बळी मिळवणारा खेळाडू ठरला.२०१३ च्या सचिन तेंडुलकरच्या निवृत्तीच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील कलकत्ता येथे झालेल्या पहिल्या सामन्यात भारतीय संघाची ६ बाद १५६ अशी अवस्था होती तेव्हा त्यावेळी मैदानावर होते पदार्पणाचा सामना खेळणारा रोहित शर्मा व अश्विन पण या दोघांनी शतके झळकावत सातव्या

गड्यासाठी २८० धावांची भागिदारी करत भारताला २१९ धावांची आघाडी मिळवून दिली आणि ह्याच २१९ धावा वेस्ट इंडिजला गुंडाळण्यात पुरेशी ठरल्या.

आत्ताच भारतदौऱ्यावर आलेल्या इंग्लंड संघाविरुद्ध अश्विनने २०१२ व २०१४ चे अपयश धुवून टाकत पाच सामन्याच्या मालिकेत अष्टपैलु कामगिरी करत २८ गडी बाद करत फलंदाजीत ३०६ धावा काढल्या. एका मालिकेत २५ गडी व २५० पेक्षा जास्त धावा काढणारा कपिल देव नंतर दुसरा भारतीय खेळाडु ठरला. २०१६ वर्ष अश्विनसाठी यशस्वी ठरले कारण याच वर्षात त्याने गोलंदाजाच्या कसोटी क्रमवारीत अग्रस्थान कमावले तसेच वर्षभर केलेल्या कामगिरीची पोचपावती म्हणून आयसीसीने त्याला "क्रिकेटर ऑफ द ईअर" व "टेस्ट क्रिकेटर ऑफ द ईअर" ने गौरविले तसेच आयसीसीच्या टेस्ट संघामध्ये स्थान मिळवणारा यावर्षीचा एकमेव भारतीय ठरला. अश्विन "क्रिकेटर ऑफ द ईअर" पुरस्कार मिळवणारा राहुल द्रविड (२००४) व सचिन तेंडुलकर (२०१०) नंतर तीसरा भारतीय खेळाडू ठरला.

अश्विनने २००९ मध्ये चेन्नई सुपर किंग कडून खेळताना आयपीएलमध्ये पदार्पण केले. २००९-२०१५ पर्यंत त्याने चेन्नई सुपर किंग संघाचे प्रतिनिधित्व केले तर २०१६ मध्ये पुणे सुपरजायंट्सचे प्रतिनिधित्व केले पण २०१६ चे सत्र अश्विनसाठी तितकेसे चांगले गेले नाही. आपल्या ६ वर्षांच्या क्रिकेट कारकिर्दीत अश्विनला २०१२ मध्ये पॉली उम्रीगर पुरस्काराने व २०१४ मध्ये अर्जुन पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. येणाऱ्या काळात अश्विन उपखंडात केलेल्या कामगिरीची पुनरावृत्ती परदेशातही करेल. तसेच त्याची सध्याची कामगिरी पाहता तो भारतीय क्रिकेटमधील उत्कृष्ट गोलंदाजामध्ये गणला जाईल यात काही शंका नाही.

## रविंद्र जडेजा

सध्याच्या भारतीय संघाच्य़ गोलंदाजीचा महत्त्वाचा घटक. गुजरातमध्ये जन्मलेल्या या खेळाडुने कमी वयातच सौराष्ट्राच्या रणजी संघात प्रवेश मिळवला. घरची परिस्थिती बेताची असताना जडेजाने परिश्रम करुन जागतिक क्रिकेटमध्ये आपले नाव कमावले. वयाच्या १६ व्या वर्षी त्याने भारताच्या युवा संघात स्थान मिळवले आणि २००६ व २००८ साली आलेल्या युवा विश्वचषकामध्ये भारताचे प्रतिनिधित्त्व केले. जिथे एखाद्या खेळाडुला देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळत नाही तिथे जडेजाने दोनदा युवा विश्वचषकात खेळला. २००६ मध्ये त्याला इतकी संधी मिळाली नाही पण पाकिस्तानविरुद्ध झालेल्या अंतिम सामन्यात १६ धावांत ३ गडी बाद केले आणि याची पुनरावृत्ती त्याने २००८ च्या विश्वचषकात करत भारताला विश्वचषकात करत भारताला विश्वचषक जिंकुन देण्यात हातभार लावला.



युवा विश्वचषकात केलेल्या कामगिरीच्या जोरावर त्याला २००८ व २००९ मध्ये शेन वॉर्नच्या नेतृत्वातील राजस्थान रॉयल्सचे आयपीएलमध्ये प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. यातील २००८ मध्ये राजीस्थानने विजेतेपदकाला गवसणी घातली त्यात अष्टपैलु रविंद्र जडेजाचा मोलाचा वाटा होता. रविंद्र जडेजाने कामगिरीच्या जोरावर त्याने भारतीय संघात प्रवेश मिळवला आणि पहिल्याच एकदिवसीय सामन्यात अर्धशतकी खेळी केली. २०१२ मध्ये जडेजा प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये तीन त्रिशतके झळकावणारा पहिला भारतीय फलंदाज बनला यासोबतच तो डॉन ब्रॅडमन, ब्रायन लारा, डब्लु जी ग्रेस, माईक हसी, ग्रॅहम हीक, बील पॉनसफोर्ड, वॉल्टर हॅमंड यांसारख्या दिग्गजांच्या यादीत जाऊन बसला महत्त्वाची बाब म्हणजे त्याने हा पराक्रम वयाच्या २३ व्या वर्षी केला. तीन त्रिशतकांमधील दोन त्रिशतके त्याने २०१२ च्या सत्रात केली याच कामगिरीच्या जोरावर त्याला इंग्लंडविरुद्धच्या कसोटी पदार्पणाची संधी मिळाली.२००८-०९ च्या रणजी मोसमात त्याने ४२ बळी व ७३९ धावा फटकावत अष्टपैलु कामगिरी करत भारताच्या एकदिवसीय संघात स्थान मिळवले परंतु २००९ च्या टी-२० विश्वचषकातील इंग्लंडविरुद्धच्या सामन्यातील कामगिरीमुळे त्याला टिकाकारांना सामोरे जावे लागलेहोते.

कसोटी मालिकेनंतर झालेल्या एकदिवसीय मालिकेतील दुसऱ्या सामन्यात जडेजाने ६१ धावांची आक्रमक खेळी केली ती फक्त ३७ चेंडूत तसेच गोलंदाजीत १२ धावांत २ गडी बाद करत सामनावीराचा पुरस्कार पटकावला. परंतु जडेजाच्या कारकिर्दीला खरी कलाटणी दिली ती २०१३ मध्ये भारताने मायदेशात ऑस्ट्रेलियाविरुद्ध मिळवलेला ४-० ने विजय या मालिकेत जडेजाने तब्बल २४ गडी बाद केले त्यात त्याने ५ वेळेस ऑस्ट्रेलियाचा कर्णधार राहिलेल्या मायकेल क्लार्कला आपला बकरा बनवला. यातील शेवटच्या सामन्यातील दुसऱ्या डावात ५ बळी घेत सामनावीराचा पुरस्कार आपल्या नावे केला.

त्यानंतर २०१३ मध्ये इंग्लंडमध्ये झालेल्या चॅम्पियन ट्रॉफीत विजय संपादन करण्यात जडेजाने महत्तवाची भुमिका निभावली. या स्पर्धेत त्याने सर्वाधिक १२ गडी बाद करत "गोल्डन बॉल" चा मानकरी ठरला यात वेस्ट इंडिजविरुद्ध ३६ धावा देत ५ गडी तसेच अंतिम सामन्यात नाबाद ३६ व २४ धावा देत २ गडी सुद्धा बाद केले. या कामगिरीनंतर जडेजाने आयसीसीच्या गोलंदाजांच्या एकदिवसीय क्रमवारीत पहिला क्रमांक पटकावला. याआधी भारताकडून कपिल देव, मनिंदर सिंग व अनिल कुंबळेने भारताकडून क्रमवारीत पहिला क्रमांक पटकावला होता.आयपीएलमध्ये जडेजाने २००८-०९ मध्ये राजस्थान

रॉयल्सचे, २०११ मध्ये कोची तस्कर्सचे प्रतिनिधित्व केले पण २०१२ च्या सत्रासाठी झालेल्या बोलीत चेन्नई सुपरकिंगने जडेजाला तब्बल २० ताख डॉलर्सला खरेदी केले. २०१२-१५ या ४ सत्रापैकी ३ वेळेस संघाला आपल्या कामगिरीच्या जोरावर अंतिम फेरीत घेऊन गेला. याच काळात जडेजा "सर जडेजा" म्हणून ओळखला जाऊ लागला आणि धोनीचा विश्वासु खेळाडू बनला.

२०१५ हे वर्ष जडेजासाठी तितकेसे लाभदायक ठरले नाही. २०१५ च्या विश्वचषकात त्याची कामगिरी सरासरी झाली मग ती गोलंदाजीत असो वा फलंदाजीत. विश्वचषकानंतर बांग्लादेशविरुद्धच्या मालिकेत केलेल्या खराब कामगिरीमुळे त्याला संघातले स्थान गमवावे लागले. परंतु जडेजाने अपयश विसरुन रणजी मोसमात जोरदार कामगिरी करत ४ सामन्यांत ३८ विकेट घेतल्या यांत ६ वेळेस एका डावात ५ गडी बाद केले तसेच फलंदाजीत ३ अर्धशतके झळकावत २१५ धावा फटकावल्या. या कामगिरीच्या जोरावर त्याने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेत पुनरागमन केले आणि या मालिकेत त्याने रणजी सामन्यांप्रमाणेच गोलंदाजीत आपला जलवा दाखवत चार सामन्यांत २३ बळी घेतले व खालच्या क्रमांकावर महत्त्वाच्या खेळी केल्या.

२०१६ साली न्युझिलंडविरुद्धच्या मालिकेतही त्याने आपला अष्टपैलु खेळ दाखवला व कानपुर येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटीसामन्यांत ६ बळी व १२ धावा अशी कामगिरी करत सामनावीराचा पुरस्कार पटकावला. न्युझिलंडविरुद्धच्या मालिकेप्रमाणेच इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत अश्विन व जडेजाच्या फिरकीचा दबदबा राहिला. इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत अश्विनने २८ तर जडेजाने २६ विकेट घेत इंग्लंडच्या फलंदाजीतली हवाच काढली. यात चेन्नई येथे झालेल्या शेवटच्या कसोटीत भारताला अखेरच्या दिवशी १० गडी बाद करण्याची आवश्यकता होती. एकवेळ इंग्लंड संघ २ बाद ११० अशा स्थितीत होतो पण जडेजाच्या फिरकीने त्यांची कंबरच मोडली आणि त्यांचा डाव २०७ धावांत आटोपला व भारताने ४-० ने मालिका खिशात घातली. या सामन्यांत जडेजाने १० बळी व धडाकेबाज अर्धशतकही झळकावले. या संपुर्ण मालिकेत गोलंदाजीबरोबरच खालच्या क्रमांकावर फलंदाजीला येऊन २२४ धावांचे योगदान सुद्धा दिले.जडेजा हा त्याच्या गोलंदाजी शैलीने च्रर्चेत राहतो तो फलंदाजांना दोन चेंडूमधील वेळेत विचार सुद्धा करण्याची संधी देत नाही आपले षटक पटकन पुर्ण करतो त्यामुळे फलंदाजांवर दडपण निर्माण होते.

## चेतेश्वर पुजारा

भारताच्या कसोटी संघातील अतिमहत्त्वाचा फलंदाज. राजकोटमध्ये जन्मलेल्या या फलंदाजाने आपल्या तंत्रशुद्ध फलंदाजीने सर्वांचे लंक्ष वेधले तसेच मोठी खेळी करण्याची सवय त्याने सुरुवातीपासुनच आत्मसात केली होती आणि याच कामगिरीच्या जोरावर त्याने राहुल द्रविडच्या निवृत्तीनंतर त्याचा फलंदाजीतील तीसरा क्रमांक आपल्या नावे केला. त्याची जुन्या पद्धतीची फलंदाजीची शैली आणि त्याचा उत्कृष्ट बचाव यामुळे त्याला सुरुवातीला १४ वर्षांखालील मग रणजीत सौराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आणि कामगिरीच्या जोरावर भारतीय संघात स्थान मिळवले.




सुरुवातीपासुनच मोठ्या खेळी करण्याची भुक असल्याच त्याने दाखवण्यास सुरुवात केली होती. १४ वर्षांखालील स्पर्धेत बडोद्याविरुद्ध खेळताना त्याने त्रिशतक झळकावले होते आणि त्यानंतर त्याने मोठ्या खेळी करण्याचा सपाटाच लावला होता. यानंतर १९

वर्षाखालील सामन्यात इंग्लंडविरुद्ध खेळताना द्विशतक आणि दुसऱ्याच प्रथम श्रेणी सामन्यात १४५ धावांची खेळी केली. २००६ साली झालेल्या १९ वर्षांखालील विश्वचषकात पुजाराने भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले. या विश्वचषकात त्याने ११६ च्या सरासरीने सर्वाधिक ३४६ धावा ठोकल्या.२००७-०८ च्या रणजी मोसमात चेतेश्वर पुजाराने सर्वाधिक ८०७ धावा काढल्या आणि त्यानंतर २००८-०९ व २०१२-१३ च्या मोसमात प्रत्येकी एक त्रिशतक झळकावले तसेच प्रथम श्रेणी कारकिर्दीत एकुण ३ त्रिशतके झळकावली.

२००८ साली कोलकत्ता नाईट रायडर्सने पुदाराला आपल्या संघात सामिल करुन घेतले आणि त्य़ानंतर २०११ साली रॉयल चॅलेंजर्स बेंगलोरच्या संघात सामील झाला.२०१० साली पुजारासाठी पहिल्यांदा भारतीय संघाचा दरवाजा उघडला गेला तो ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी. यात त्याने ७२ धावांची उपयुक्त खेळी करत भारताला बेंगलोरची कसोटी जिंकुन दिली. त्यानंतर त्याची दक्षिण आफ्रिकेतील मालिकेसाठी निवड करण्यात आली पण तिथल्या जलद खेळपट्ट्यावर त्याला अपयश आले आणि नंतर त्याला दुखापतीने ग्रासले त्यामुळे त्याला आधी आयपीएल आणि मग ऑस्ट्रेलिया दौऱ्यातून सुद्धा बाहेर व्हावे लागले.

दुखापतीतून बाहेर आल्यानंतर पुजाराने पाठीमागे वळुन पाहिलेच नाही. २०१२ साली मायदेशात इंग्लंडविरुद्ध झालेल्या कसोटी मालिकेतील पहिल्याच सामन्यात नाबाद २०६ धावांची खेळी करत पहिले द्विशतक झळकावलेच तसेच पुढच्याच सामन्यात १३५ धावांची खेळी केली. कामगिरीच्या जोरावर त्याची एकदिवसीय मालिकेसाठी निवड झाली पण त्याला संधी मिळाली नाही. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पुढच्याच मालिकेत त्याने कारकिर्दीतले दुसरे द्विशतक झळकावत भारताला ४-० ने विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भुमिका पार पाडली. कसोटीतल्या कामगिरीच्या बळावर पुजाराला २०१३ मध्ये एकदिवसीय संघात स्थान मिळाले पण त्यात तो अपयशी ठरला.

२०१३ साली सचिन तेंडुलकरच्या निवृत्तीच्या मालिकेत मुंबई येथे झालेल्या दुसऱ्या सामन्यांत पुजाराने कारकिर्दीतले पाचवे शतक झळकावले व सचिन तेंडुलकरसोबत तीसऱ्या गड्यासाठी १४४ धावांची महत्त्वपुर्ण भागिदारी करत भारताला पहिल्या डावात मोठी आघाडी मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला. पुजाराने मायदेशात खेळलेल्या सामन्यांमधील कामगिरीत सातत्य टिकवून ठेवले होते त्यामुळे त्याची खरी परीक्षा होती ती परदेश दौऱ्यात त्याची सुरुवात झाली आफ्रिका दौऱ्याने. या दौऱ्यातील पहिल्या सामन्याच्या

दुसऱ्या डावात विराट कोहलीसोबत २२२ धावांची महत्त्वपुर्ण भागिदारी करत भारताला सुस्थितीत नेऊन ठेवले होते परंतु डुप्लेसिस व ए बी डिव्हीलीअर्सच्या शतकी खेळींनी दक्षिण आफ्रिकेला विजयाजवळ नेऊन ठेवले पण शेवटी सामना अनिर्णित राहिला. पुढच्या सामन्यात सुद्धा त्याने अर्धशतकी खेळी केली. या कामगिरीची पुनरावृत्ती करण्यात पुजाराला २०१४ च्या न्युझिलंड, ऑस्ट्रेलिया व इंग्लंडच्या दौऱ्यात पुर्णपणे अपयश आले. या तीन दौऱ्यात त्याला फक्त एक अर्धशतक झळकवता आले तर ऑस्ट्रेलिया दौऱ्यात त्याला काही सामन्यांत संघाबाहेरही बसावे लागले.

२०१५ साली श्रीलंका दौऱ्यावर गेलेल्या भारतीय संघात पुजाराचा समावेश होता परंतु पहिल्या दोन सामन्यात मुरली विजय दुखापतग्रस्त झाल्याने तीसऱ्या सामन्यात पुजाराला सलामीला खेळण्याची संधी मिळाली आणि संधीचा पुरेपुर फायदा उठवत नाबाद १४५ धावांची खेळी करत भारताला आव्हानात्मक धावसंख्या उभारुन दिली. याच सामन्यात भारताने विजय मिळवत २-१ ने मालिका जिंकली.२०१५ श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेनंतर भारताचा सामना होता मायदेशात खेळल्या जाणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत. या मालिकेत त्याला फक्त एका अर्धशतकावर समाधान मानावे लागले. २०१६ च्या वेस्ट इंडिजच्या मालिकेतही पुजाराची अपयशाची मालिका सुरुच राहिली. न्युझिलंडविरुद्धच्या मालिकेने २०१६-१७ चा भारताचा मायदेशातील मालिकांना सुरुवात झाली. या मालिकेतील पहिल्या दोन सामन्यात पुजाराने तीन अर्धशतके झळकावली पण त्याला तो अर्धशतकाच शतकात रुपांतर करण्यात अपयशी ठरत होता परंतु तीसऱ्या आणि शेवटच्या सामन्यात त्याने शतकाला गवसणी घातलीच.

न्युझिलंडविरुद्धच्या मालिकेनंतर भारताचा सामना होता इंग्लंडशी. न्युझिलंडविरुद्ध केलेल्या कामगिरीत सातत्य राखत मानिकेतल्या पहिल्या दोन सामन्यात दोन शतके झळकावत मालिकेत ४०१ धावा काढत मालिका विजयात महत्त्वपुर्ण भुमिका बजावली. पुजाराच्या मायदेशातील कामगिरीवर कोणालाही शंका नाही पण त्याच्या विदेशातील कामगिरीवर अनेक जण प्रश्नचिन्ह उपस्थित करतात मग ते त्याच्या फलंदाजी शैली बाबत असो, स्ट्राईक रोटेट करण्याबाबत असो वा त्याच्या क्षेत्ररक्षणाबाबत असो. स्ट्राईक रोटेट करण्याच्या क्षमतेवरुन त्याला २०१६ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध झालेल्या मालिकेतील काही सामन्यांत बाहेर बसावे लागले होते पण मायदेशात त्याचा स्ट्राईक रेट सर्वोत्तम आहे त्यामुळे त्याला विदेशातील कामगिरीवर लक्ष केंद्रित करावे लागेल.

# मुरली विजय

सध्याच्या भारतीय संघातील भरवशाचा सलामीवीर. तामिलनाडुचा हा खेळाडु आपल्या धडाकेबाज फलंदाजीने चर्चेत राहिला. १७ व्या वर्षी क्रिकेट खेळण्यास सुरुवात केल्यानंतर अभिनव मुकुंदच्या साथीने सलामीला खेळताना रणजीचषकात ४६९ धावांची सलामी दिली आणि एक युवा सलामी जोडी चर्चेत आली. ४६९ धावांच्या भागिदारीनंतर त्यांचा विश्वविक्रम फक्त २ धावांनी हुकला. २००४-०५ मध्ये विजयचा २२ वर्षांखालील तामिळनाडुच्या संघात समावेश झाला पण त्याला हवी तशी कामगिरी करता आली नाही पण स्पर्धेतील अपयश विसरुन पुन्हा एकदा क्लब क्रिकेटवर लक्ष केंद्रित केले आणि त्याची पुन्हा २००५-०६ च्या सी के नायडु ट्रॉफीसाठी २२ वर्षांखालील तामिळनाडुच्या संघात समावेश करण्यात आला पण पुन्हा एकदा विजय स्पर्धेत पुर्णपणे अपयशी ठरला.



सी के नायडु व क्लब क्रिकेटमधील विजयची कामगिरी सरासरीपेक्षा कमी होती पण तरीही त्याची देशांतर्गत एकदिवसीय स्पर्धेसाठी तामिळनाडुच्या संघात निवड झाली. २००६-०७ च्या रणजी मोसमात विजयने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि याच मोसमात स्पर्धेत सर्वाधिक धावा काढणाऱ्या फलंदाजांमध्ये तीसरा क्रमांक पटकावला त्यात त्याने ५२ च्या सरासरीने ६२८ धावा फटकावल्या त्यात दोन शतके व एका अर्धशतकाचा समावेश होता. त्यानंतर कामगिरीत सातत्य राखत त्याने देशांतर्गत एकदिवसीय स्पर्धेत ७ सामन्यांत २७७ धावा काढल्या. रणजीच्या पुढच्याच सत्रात त्याने पुन्हा एकदा फलंदाजीचा जलवा दाखवला.

देशांतर्गत स्पर्धांमध्ये केलेल्या कामगिरीच्या जोरावर विजयचा २००८ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या चौथ्या कसोटीसाठी संघात समावेश झाला ते गौतम गंभीरला एक सामन्याची बंदी घातल्याने. ज्यावेळेस त्याची संघात निवड झाली तेव्हा तो रणजी सामना खेळत होता आणि त्याने कसोटी पदार्पण केले ते रणजी सामन्याच्या शेवटच्या दिवशी. पदार्पणच्या कसोटीत केलेल्या खेळीने त्याने इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत संघात प्रवेश मिळवला परंतु त्यावेळेस त्याला संधी मिळाली नाही. २००९ मध्ये विजयला गौतम गंभीरच्या जागी श्रीलंकेविरुद्धच्या शेवटच्या कसोटीत सेहवागच्या साथीने सलामीला खेळला. या दोघांनी २२१ धावांची भागिदारी केली पण विजय ८७ धावांवर बाद झाला व पहिल्या वहिल्या शतकापासुन १३ धावांनी दुर राहिला.

विजयने आयपीएलमध्ये २००९-१३ पर्यंत चेन्नई सुपरकिंगचे प्रतिनिधित्व केले. यातील २०१०-१३ च्या सत्रांत चेन्नई सुपरकिंगसाठी महत्त्वपुर्ण भुमिका निभावली. त्यात चेन्नईने २०१० व २०११ च्या सत्रात विजय संपादन केला तर २०१२ व २०१३ च्या सत्रात उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. विजयने २०१० व २०१२ च्या सत्रात प्रत्येकी एक शतक ठोकले. २०१० मध्ये चॅम्पियन लीग टी-२० स्पर्धेत २९४ धावा करत स्पर्धेत सर्वाधिक धावा काढण्याचा मान मिळवला. विजयने २०१४ च्या सत्रात दिल्ली डेअरडेव्हिल्सचे तर २०१५-१६ च्या सत्रात किंग्स इलेव्हन पंजाबचे प्रतिनिधित्व केले यातील २०१६ च्या सत्रात त्याने संघाचे नेतृत्व सुद्धा केले.

२०१० च्या आयपीएल सत्रात केलेल्या कामगिरीच्या जोरावर विजयची २०१० च्या टी-२० विश्वचषकाच्या संघात निवड करण्यात आली पण त्यात तो पुर्णपणे अपयशी ठरला. तशी विजयची एकदिवसीय कारकिर्दसुद्धा अपयशीच ठरली. २०१० मध्ये त्याला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पदार्पणाची संधी मिळाली त्यात तो अपयशी ठरला तरी सुद्धा पुन्हा त्याला

स्व:ताला सिद्ध करण्याची संधी मिळाली ती २०१० च्या न्युझिलंडविरुद्धच्या मालिकेसाठी परंतु पहिल्या तीन सामन्यातील त्याच्या गचाळ कामगिरीमुळे पुढील दोन सामन्यात त्या बाहेर बसावे लागले होते.

२००८ मध्ये कसोटीत पदार्पण केल्यानंतर विजयने २०१० मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळताना पहिलं शतक झळकावला परंतु त्यानंतरच्या ९ डावात त्याला अर्धशतकही झळकावता आले नाही त्यामुळे त्याला संघाबाहेर व्हावे लागले पण २०१२-१३ च्या देशांतर्गत स्पर्धांतील कामगिरीमुळे त्याने एकदा भारतीय संघात स्थान मिळवले मग पुन्हा मागे वळुन पाहिलेच नाही आणि दुसरे शतक झळकावत कसोटीतील त्याची १६७ ही आपली सर्वोच्च धावसंख्या नोंदवली ती ऑस्ट्रेलियाविरुद्धच. त्यानंतरच्याच सामन्यात त्याने तीसरे शतक साजरे केले. या मालिकेत त्याने दोन शतकं आणि एका अर्धशतकाच्या सहाय्याने ४३० धावा ठोकल्या आणि २०१३ मध्ये इंग्लंडमध्ये झालेल्या चॅम्पियन ट्रॉफीच्या संघात स्थान मिळवले खरे पण सराव सामन्यातील निराशजनक कामगिरीमुळे त्याला एकाही सामन्यात संधी मिळाली नाही. मात्र त्यानंतरच्या वेस्ट इंडिजमध्ये झालेल्या तिरंगी मालिकेत त्याला संधी मिळाली आणि पुन्हा एकदा त्याने निराश केले.

सचिनच्या निवृत्तीच्या मालिकेत विजयला दोन कसोटीत फक्त ६९ धावा करता आल्या होत्या तर आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत त्या फक्त एक अर्धशतक आणि न्यझिलंडविरुद्धच्या मालिकेत तर तो पुर्णपणे अपयशी ठरला. विजयने भारताबाहेर पहिले शतक ठोकले ते इंग्लंडविरुद्ध ट्रेंट ब्रिजला. त्यात त्याने १४६ धावांची खेळी केली तर लॉर्डसला झालेल्या दुसऱ्या डावात महत्त्वपूर्ण ९५ धावांची खेळी करत भारताच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. या मालिकेत त्याने ४०२ धावा काढत भारताकडून सर्वाधिक धावा काढण्याचा मान मिळवला. त्यानंतर विजयची परीक्षा होती ती ऑस्ट्रेलियाविरुद्ध. या मालिकेत विजयने ४ सामन्यात ४८२ धावा काढल्या त्यात एक शतक व ४ अर्धशतकांचा समावेश होता. मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताला विजयासाठी ३६४ धावांची गरज होती. या आभाळाएवढ्या वाटणाऱ्या धावसंख्येला विजय व कोहलीच्या जोडीने चोख प्रत्त्युतर देत तीसऱ्या गड्यासाठी १८५ धावांची महत्त्वपुर्ण भागिदारी करत विजय आवाक्यात आणला होता पण बाकीच्या फलंदाजांच्या अपयशामुळे भारताचा पराभव झाला परंतु विजयने ज्याप्रकारे कोहलीला साथ दिली ती कौतुकास पात्र होती. त्यानंतरच्याच ब्रिसबेनच्या सामन्यात त्याने १४४ धावांची खेळी करत भारतीयाची त्या मैदानावरची सर्वोच्च धावसंख्या नोंदवली.

२०१५ च्या बांग्लादेश दौऱ्यात विजयने धवनच्या साथीने भारताला पहिल्या डावात मोठी धावसंख्या उभारुन दिली त्यात विजयने १५० धावा काढल्या होत्या. श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेतील पहिल्या व तीसऱ्या सामन्यात दुखापतीमुळे विजय खेळु शकला नव्हता पण दुसऱ्या सामन्यात त्याने ८२ धावांची महत्त्वाची खेळी केली होती. तर आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत विजयची कामगिरी सरासरी राहिली. २०१६ च्या वेस्ट इंडिज दौऱ्यातील पहिल्याच सामन्यात विजय खेळला पण त्यातही तो अपयशी ठरला तर दुखापतीमुळे उर्वरित मालिकेत तो खेळु शकला नाही. न्युझिलंडविरुद्धच्या मालिकेत फक्त एक अर्धशतक करण्यात विजय यशस्वी ठरला पण न्युझिलंडविरुद्धचे अपयश त्याने इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत धुवून  काढत ४ सामन्यात दोन शतकांसह ३२८ धावा काढत भारताच्या मालिका विजयात महत्त्वाची भुमिका पार पाडली. गेल्या काही वर्षांपासुन विजय भारतीय कसोटी संघाचा महत्त्वाचा भाग राहिला आहे आणि हीच भुमिका तो येणाऱ्या काळातही पार पाडेल अशी आशा आहे.

## मनीष पांडे

मनीष पांडे देशांतर्गत पातळीवरील एक महत्वाचे नाव. राष्ट्रीय पातळीवर कर्नाटकचे नेतृत्व करत खोऱ्याने धावा काढणारा खेळाडू. पहिल्यांदामनीष पांडेने आपली झलक दाखवली ती २००८ साली मलेशियात झालेल्या १९वयोगटाच्या विश्वचषकात जेव्हा भारताने विराट कोहलीच्या नेतृत्वात विजेतेपदाला गवसनी घातली. या कामगिरीच्या जोरावर त्याने आयपीएलच्या मुंबई इंडियन्स संघात स्थान मिळविले परंतु पाहिजे तितकी संधी मिळाली नाही पण आयपीएलच्या दुसऱ्या सत्रात त्याला बँगलोर संघाकडून खेळण्याची संधी मिळाली आणि त्याने संधीचा पुरेपुर फायदा उठवला. याच सत्रात त्याने ७३ चेंडूत नाबाद ११४ धावांची खेळी करून आयपीएलमधील पहिला भारतीय शतकवीराचा मानही मिळवला तसेच या खेळीने संघाला उपांत्य फेरीत धडक मारून दिली. सलग दुसय़ा सामन्यात ४८ धावांची खेळी करून संघाला अंतिम सामन्यात नेऊन ठेवले.



मनीष पांडेने देशांतगर्रत स्पर्धेच्या प्रत्येक स्पर्धेत धावांचा डोंगर उभा केला. २००९-१० च्या रणजी मोसमात त्याने चार शतके आणि पाच अर्धशतकांच्या सहाय्याने सर्वाधिक ८८२ धावा ठोकल्या. याच रणजी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात कर्नाटकला ३३८ धावांची आवश्यकता होती त्यात मनीषने १४४ धावांची खेळी केली पण ही खेळी मुंबईला विजेतेपदापासुन रोखू शकली नाही. मनीषने एक उत्कृष्ट फलंदाजाबरोबरच एक उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणूनही आपला ठसा उमटवला आहे. २०१२ व २०१४ साली कोलकत्ता संघाला आयपीएल चषक जिंकवण्यात मनीष पांडेचा मोलाचा वाटा होता त्यात २०१४ च्या अंतिम सामन्यात पंजाबविरूद्ध २०० धावांचे लक्ष्य असताना ५० चेंडूत ९४ धावांची खेळी करून संघाला विजय प्राप्त करून दिला.

२०१५ साली मनीष पांडेला पहिल्यांदा भारतीय संघात स्थान खेळण्याची संधी मिळाली ती झिंबाब्वे विरूद्ध आणि पहिल्याच सामन्यात केदार जाधव सोबत महत्त्वाची भागिदीरी करुन अर्धशतकी खेळी केली. त्यानंतर त्याला संधी मिळाली ती ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या मालिकेत पहिल्या सामन्यात अपयशी ठरल्यानंतर त्याला संघाबाहेर बसावे लागले परंतु अजिंक्य रहाणे जखमी झाल्याने मनीषला शेवटच्या सामन्यात संधी मिळाली. भारताने आधीच मालिका गमवली होती पण व्हाईटवॉश रोखण्यासाठी विजय महत्त्वाचा होता. भारताला विजयासाठी ३३१ धावांची आवश्यकता होती त्यामुळे भारताला चांगल्या सुरुवातीची आवश्यकता होती पण चांगल्या सुरुवातीनंतर भारताने दोन फलंदाज झटपट गमावले पण रोहित शर्मा व मनीष पांडेने ९७ धावांची महत्त्वाची भागिदारी केली आणि मनीष पांडेने धोनी बरोबर ९४ धावांची भागिदारी केली व शेवटी मनीषने भारताला विजय मिळवून दिला. या सामन्यात मनीषने नाबाद १०४ धावांची खेळी केली ती फक्त ८१ चेंडूत. या कामगिरीच्या जोरावर त्याला झिंबाब्वे विरूद्धच्या संघात स्थान मिळाले पण त्याला हवी तितकी फलंदाजीची संधी मिळाली नाही.

ऑस्ट्रेलियाविरूद्ध शेवटच्या सामन्यात शतकी खेळी करुन संघाला विजय मिळवून  दिल्यानंतर संघाला मधल्या फळीसाठी एक पर्याय दिला. त्यानंतर २०१६ च्या आयपीएल सत्रात १२ सामन्यात २४८ धावा काढल्या. त्यानंतर झिम्बाब्वेविरूद्धच्या एकदिवसीय सामन्यात त्याला फलंदाजीची संधी मिळाली नाही पण टी-२० मालिकेतल्या पहिल्या सामन्यात ४८ धावा काढल्या खऱ्या पण तो भारताला विजय मिळवून  देण्यात अपयशी ठरला व भारताने २ धावांनी सामाना गमावला.

२०१६ च्या न्युझिलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी मनीषचा संघात समावेश करण्यात आला तसेच धवनच्या अनुपस्थितीमुळे रहाणे सलामीला खेळल्याने पांडेला मधल्या फळीत खेळण्याची संधी मिळाली पण संधीचा फायदा उठवण्यात तो पुर्णपणे अपयशी ठरला आणि ४ डावांत फक्त ४८ धावा काढल्या. सद्यस्थितीत जर एखाद्या खेळाडुला संघातील स्थान टिकवायचे असेल तर कामगिरीत सातत्य असावे लागते कारण नवनवीन युवा खेळाडु जागतिक पातळीवर आपला ठसा उमटवण्यास आतुर आहेत. एकदा संघातील स्थान गमावले की पुन्हा संघात संधी मिळण्याची शक्यता कमीच आहे त्यामुळे मनीषला कामगिरीत सातत्य टिकवावे लागेल. त्यामुळे येत्या काळात त्याच्या कामगिरीवर सर्वांची नजर असेल.

# के एल राहुल

के एल राहुल कर्नाटकचा एक युवा खेळाडू. कर्नाटकच्या संघातीलएक महत्वाचा खेळाडू. २०१०-११ च्या मोसमात पदार्पणात हवी तशी कामगिरी करता न आल्यामुळे पुढच्या मोसमात संघात स्थान मिळाले नाही पण मेहनतीच्या जोरावर २०१२-१३ च्या सत्रात संघात स्थान मिळविले आणि संघाचा महत्वाचा खेळाडू म्हणून स्थान राखले. राहूलने २०१३-१४ च्या सत्रात रणजीमध्ये एक हजारपेक्षा अधिक धावा ठोकल्या आणि २०१३-१४ व २०१४-१५ या सलग दोन सत्रात कर्नाटकला रणजीचे विजेतेपद मिळविण्यात महत्त्वाची कामगिरी केली.



देशांतर्गत स्पर्धेतल्या कामगिरीच्या जोरावर त्याने भारताच्या कसोटी संघात स्थान मिळविले तेही ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत. पहिल्या सामन्यात साजेशी कामगिरी करता आली नाही पण सिडनितल्या कसोटीत सलामीला येताना ११० धावांची खेळी केली. तसेच श्रीलंकेविरुद्ध मालिकेत जखमी धवनच्या जागी राहुलला सलामीची संधी मिळाली आणि मिळालेल्या संधीचा पुरेपुर फायदा उठवत शतकाला गवसणी घातली आणि भारतीय संघाला मालिकेत बरोबरी साधुन दिली. त्यासामन्यात एका फलंदाजाबरोबरच यष्टीरक्षकाची भुमिका पार पाडली. धोनीने कसोटीतून निवृत्ती घेतल्यामुळे भारताला एका चांगल्या यष्टीरक्षाकाची व फलंदाजाची कमतरता भासते. सध्या वृद्धीमान साहा यष्टीरक्षकाची भुमिका पार पाडतो पण त्याच्या फलंदाजीबाबत साक्षंकता आहेत्यामुळे जर राहुलच्या कामगिरीत सातत्य राखले तर तो साहाची जागा घेऊ शकतो.

कामगिरीत राखलेल्या सातत्याने राहुलचा आयपीएलच्या बँगलोर संघात समावेश समावेश करण्यात आला त्यानंतर राहुलने २०१४ साली आयपीएल मध्येहैदराबादचे नेतृत्व केले आणि २०१६ मध्ये बँगलोरला अंतिम सामन्यापर्यंत पोहचवण्यात महत्त्वाची भुमिका निभावली. २०१६ च्या सत्रात राहुलने ३९७ धावा ठोकल्या याच कामगिरीच्या जोरावर त्याची झिम्बावे दौय़ावर जाणाऱ्याएकदिवसीय व टी-२० संघात तसेच वेस्ट इंडिज दौय़ावर जाणाय़ा कसोटी संघात निवड झाली. राहुलने झिम्बावेविरुद्ध खेळलेल्या पदार्पणाच्या एकदिवसीय सामन्यात शतकी खेळी आणि भारताकडून पदार्पणाच्या एकदिवसीय सामन्यात शतकीखेळी करणारा पहिला खेळाडू ठरला तसेच राहुलला पदार्पणाच्या मालिकेत मालिकावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. परंतु टी-२० च्या पहिल्याच सामन्यात पहिल्याच चेंडूवर त्रिफळाचीत झाला.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेत राहुलला संधी मिळेल की नाही असे वाटत होते पण पहिल्या सामन्यात मुरली विजय जखमी झाला आणि त्या जागी धवन सोबत राहुल सलामीला आला आणि याचा पुरेपुर फायदा उठवत त्याने १५८ धावांची खेळी करत भारताला मोठी धावसंख्या उभारुन दिली त्याच बरोबर एक अर्धशतक सुद्धा झळकावले. कसोटी मालिकेनंतर अमेरिकेत झालेल्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात वेस्ट इंडिजने २४५ धावांचा डोंगर उभा केला होता. २४५ चा पाठलाग करताना भारतीय संघ २ बाद ४८ अशा स्थितीत होता त्यानंतर रोहित शर्मा व राहुलने तीसऱ्या गड्यासाठी ८९ धावांची तर चौथ्या गड्यासाठी राहुलने धोनीसोबत १०७ धावांची भागिदारी केली यात राहुलने आपले पहिले टी-

२० शतक झळकावले अशी कामगिरी करणारा राहुल रैना व रोहित शर्मानंतर तीसरा खेळाडु ठरला.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या कामगिरीनंतर राहुलला विजयसोबत न्युझिलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत सलामीला खेळण्याची संधी मिळाली. पहिल्या कसोटीत दोन्ही डावात संघाला धडाकेबाज सुरुवात करुन दिली पण दुखापतीमुळे त्याला उर्वरीत कसोटी व एकदिवसीय मालिकेला मुकावे लागले. त्यानंतर इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यात त्याने पुनरागमन केले याच मालिकेतील चेन्नई येथे झालेल्या पाचव्या व शेवटच्या कसोटीत ३११ चेंडूत १९९ धावांची अनोखी खेळी खेळली यात त्याने १६ चौकार व ३ षटकार मारले. तसेच पार्थिव पटेलसोबत १५२ धावांची सलामी भागिदारी केली तर करुण नायरसोबत १६१ धावांची चौथ्या गड्यासाठी भागिदारी केली आणि संघाला पहिल्या डावात मोठी आघाडी मिळवून दिली व भारताने ४-० ने मालिका खिशात घातली. पण जर त्याला संघात कायम राहायचे असेल तर त्याला कामगिरीत सातत्य टिकवावे लागेल.

# भुवनेश्वर कुमार

सध्याच्या भारतीय संघातील मर्यादित षटकांसाठीचा महत्त्वाचा खेंळाडू.एखाद्याजलदगती गोलंदाजाने ५० षटकांच्या सामन्यात सलग १० षटंक टाकण्याची क्षमतातसेच त्याच्या स्विंगने फलंदाजाच्या मनात धडका भरते. तसे पाहिले तरभुवनेश्वर कुमारला जलदगती गोलंदाज म्हणने म्हणजे वसीम अक्रम, ब्रेट ली वशोएबअख्तर यांसारख्या गोलंदाजाचा अपमान पण तरीही भुवनेश्वर कुमारने कमी वेळातआंतरराष्ट्रीय स्थरावर आपले नाव कमावले. उत्तरप्रदेशातील मेरठ मध्येजन्मलेल्या भुवनेश्वरने देशांतर्गत स्पर्धांत उत्तरप्रदेशचे नेतृत्व केले.पहिल्यांदा भुवनेश्वरचे नाव आले ते दुलिप ट्रॉफीत मध्य विभागाकडून खेळताना.उत्तर विभागविरुद्ध खेळताना उपांत्या सामन्याचा फासा पलटवला तसेच २००८-०९च्या रणजी ट्रॉफीतील अंतिम सामन्यात सचिन तेंडुलकरला देशांतर्गत स्पर्धांतशुन्यावर बाद करणारा पहिला गोलंदाज ठरला.



भुवनेश्वरकुमारची भारतीय संघात पहिल्यंदा वर्णी लागली ती २०१२ मध्येपाकिस्थानविरुद्ध मायदेशात झालेल्या टी-२० आणि एकदिवसीय मालिकेत. भुवनेश्वरकुमारने आपल्या पदार्पणाच्या टी-२० आणि एकदिवसीय सामन्यात पहिल्याच चेडूवरगडी बाद केला. या मालिकेत त्याला ज्याप्रकारे स्विंग मिळत होता व फलंदाजबाद केले ते पाहता भुवनेश्वर भारताला आवश्यक असलेल्या गोलंदाजाची जागा घेऊशकतो असे वाटत होते. याच कामगिरीच्या जोरावर त्याला २०१३ साली भारतातझालेल्या बॉर्डर-गावसकर मालिकेत त्यात त्याने सुरुवातीला गडी बाद करुनअश्विन व जडेजाला चांगला साथ दिली.गोलंदाजी बरोबरच त्याने फलंदाजीत सुद्धाआपले योगदान दिले. पहिल्याच कसोटी सामन्यात त्याने महेंद्रसिंग धोनीसोबतनवव्या गड्यासाठी १४० धावांची भागीदारी केली व पहिल्या डावात मोठी आघाडीमिळवून दिली.

भारताला २०१३ ची चॅम्पियन ट्रॉफी जिंकवण्यातही त्याने ठसा उमटवला.त्यानंतरवेस्ट इंडिजमध्ये झालेल्या तिरंगी एकदिवसीय मालिकेत ८ धावा देत ४ बळी घेऊनश्रीलेकेविरुद्ध आपली एकदिवसीय सामन्यातील सर्वोच्च कामगिरी बजावली यातत्यानेमालिकारवीर पुरस्काराला गवसणी घातली.मर्यादित षटकांच्या सामन्याप्रमाणेत्याला कसोटीत बळी मिळवण्यात आपयश येत होते पण फलंदाजीत तो आपली भुमिकाबजावत होता.पण याला अपवाद ठरली २०१४ इंग्लंड विरुद्धची मालिका. या मालिकेतत्याने भारताकडून सर्वाधिक बळी घेतले तसेच फलंदाजीत सुद्धा तीन अर्धशतकेझळकावली. त्यात लॉर्डसच्या कसोटीमध्ये त्याने जडेजासोबत केलेली ९९ धावांचीमहत्त्वाची भागिदारी केली व इंग्लंडला मोठे लक्ष्य दिले. भुवनेश्वर २०१५च्या विश्वचषकात महत्त्वाचा ठरणार होता परंतु तंदरुस्ती त्याला अंतिम ११खेळाडूंमध्ये संधी मिळवण्यात अडथळा ठरत होती. त्याने फक्त एक सामना खेळलापण तो त्याच्याशैलीतदिसलानाही.

मायदेशात झालेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० व एकदिवसीय मालिकेतभुवनेश्वरला सपशेल अपयश आले.टी-२० मध्ये तर त्याला एकही गडी बाद करता आलानाही आणि एकदिवसीय मालिकेत त्याने ७ गडी बाद केले त्यासाठी त्याला मोठ्याधावामोजायला लागल्या. शेवटच्या सामन्यात तर त्याने एक गडी बाद करत तब्बल १०६धावा दिल्या. कसोटी सामन्यात त्याला संधी मिळालीच नाही.२०१६ च्याविश्वचषकात त्याला संघामध्ये स्थान मिळाले नाही पण आयपीएल मध्ये स्र्वाधिक२३ बळी घेऊन संघाला

विजेतेपद मिळवून  दिले.आयपीएल नंतरच्या वेस्ट इंडिज दौऱ्यातील पहिल्या दोन सामन्यात बाहेर बसल्यानंतर त्याला तीसऱ्या सामन्यात उमेश यादवच्या जागी खेळण्याची संधी मिळाली आणि संधीचा फायदी उठवत पहिल्या डावात ५ तर दुसऱ्या डावात १ बळी घेतला. पहिल्या डावातील त्याच्या गोलंदाजीचे पुथ:करण २३.४-१०-३३-५ असे होते आणि त्याने वेस्ट इंडिजच्या फलंदाजांना पुर्णपणे जखडून ठेवले होते. त्यानंतर वेस्ट इंडिजविरुद्धच्या अमेरिकेत झालेल्या टी-२० मालिकेतही तो अपयशी ठरला.

मायदेशात न्युझिलंडविरुद्ध झालेल्या कसोटी मालिकेतील एकाच सामन्यात भुवनेश्वरला संधी मिळाली त्यात ४८ धावांत ५ व २८ धावांत १ अशी कामगिरी केली तर दुखापतग्रस्त असल्याने कसोटी मालिकेनंतरच्या एकदिवसीय मालिकेत खेळू शकला नाही. दुखापतीतून बाहेर आल्यानंतर त्याचा इंग्लंडविरुद्धच्या कसेटी मालिकेसाठीच्या संघात समावेश करण्यात आला पण पहिल्या तीन सामन्यात त्याला संधी मिळाली नाही परंतु मोहम्मद शमी दुखापतग्रस्त झाल्याने भुवनेश्वरचा संघात समावेश झाला तो मुंबईच्या सामन्यात त्यात त्याला १ गडी बाद करता आला. ज्याप्रकारे आंतरराष्ट्रीय सामन्यात पदार्पण केल्यानंतर भुवनेश्वर त्याच्या स्विंग गोलंदाजीमुळे प्रकाश झोतात आला पण वेग वाढवण्याच्या नादात त्याची स्विंग गोलंदाजी हरवल्यासारखी वाटते. तसेच त्याची स्विंग गोलंदाजी त्याच्या आधीच्या वेगावरसुद्धा घातकच होती त्यामुळे स्विंग सोडून फक्त वेगावर लक्ष देणे तर चूकिचेच आहे त्याचसोबत त्याला संघातील स्थान टिकवणे सुद्धा आवघड आहे.

## मोहम्मद शमी

झहीर खाननंतर कोण भारतीय गोलंदाजीची धुरा सांभाळेल? या प्रश्नाच उत्तर दिल ते मोहम्मद शर्माने उत्तर प्रदेशात जन्मलेल्या या खेळाडुनी फक्त आणि फक्त क्रिकेटसाठी कोलकत्ता मध्ये स्थायिक झाला आणि २०१० मध्ये बंगालचे प्रतिनिधित्व करत आसामविरुध्द प्रथम श्रेणी क्रिकेट मध्ये पदार्पण केले त्यानंतर त्याला कोलकत्ता नाईट रायडर्सने आयपीएलच्या चौथ्या सत्रात आपल्याला संघात सामील करून घेतले.



क्रिकेटमध्ये प्रत्येक खेळाडु कोणत्या ना कोणत्या गोष्टीला आपलं अस्त्र बनतो मग तो फलंदाज असो वा गोलंदाज. सचिनचा स्ट्रेट ड्राइव्ह, पॉटिंगचा पुलशॉट, कोहलीचा कव्हर ड्राईव्ह, दिलशानचा दिलस्कुप, केविन पीटरसन व डेविड वॉर्नरचा स्विच हीट त्याचप्रमाणे गोलंदाजीत वकार युनुसचा यॉर्कर, रविचंद्रन आश्विनचा कॅरम बॉल, वकार युनुस व झहिर खानचा रिव्हर्सस्विंग, सकलेन मुस्ताकचा दुसरा तसा भारतीय क्रिकेटचा विचार करता आतापर्यंत हातावर मोजण्याइतका जलदगती गोलंदाजांचा समावेश होतो की ज्यांना मोठ्या प्रमाणात यश मिळवले त्यात कपीलदेव चेतन शर्मा मनोज प्रभाकर जवागल श्रीनाथ, वेंकटेश प्रसाद आणि झहीर खान.

२०१२-१३ च्या रणजी मोसमात त्याने ५ सामन्यात २८ गडी बाद करत निवडकर्त्यांचे लक्ष वेधले आणि फक्त १५ प्रथम श्रेणी सामने खेळल्यानंतर २०१३ मध्ये पाकिस्तानविरूध्द एकदिवसीय मालिकेसाठी त्याचा संघात समावेश करण्यात झाला. मालिकेतल्या शेवच्या सामन्यात शमीला पदार्पणाची संधी मिळाली त्यात त्याने ९ षटकांत २३ धावांत १ गडी बाद केला यात ४ निर्धाव षटकांचा समावेश होता त्यामालिकेत त्याने ३ सामन्यांत ७ गडी बाद केले.एकदिवसीय सामन्यांतील कामगिरीच्या जोरावर त्याने सचिनच्या निवृत्तीच्या वेस्ट इंडिजविरुध्दच्या कसोटी मालिकेत पदार्पणाची संधी मिळली आणि पहिल्या सामन्यात ११८ धावांत ९ गडी बाद करत भारताकडून कसोटी पदार्पणात सर्वाधिक गडी बाद करणारा जलदगती गोलंदाज बनला तेही कोलकत्ता मध्ये जिथे त्याने आपल्या प्रथमश्रेणी क्रिकेटची सुरुवात केली. शमीच्या रिव्हर्स स्विंग गोलंदाजीच्या शैलीने त्याने सर्वांना मोहीत केले. आणि भारताच्या गोलंदाजीचा कणा बनला. त्यानंतर त्याचा दक्षिण आफ्रिका व न्युझिलंड दौऱ्यातील कसोटी तसेच एकदिवसीय संघात समावेश करण्यात आला दोन्ही दौऱ्यातील एकुण ४ कसोटी सामन्यात त्याने १६ बळी मिळवले.

२०१४ च्या टी-२० विश्वचषकाचा संघात त्याचा समावेश होता पण फक्त २ सामन्यात त्याला खेळण्याची संधी आणि त्याचा जागी मोहित शर्माला संधी मिळाली. शर्माने आपल्या कामगिरीने व गोलंदाजी शैलीने सर्वांना प्रभावित केल्यानंतर २०१४ च्या आयपीएल सत्रासाठी झालेल्या लिलावात सर्व संघ शमीला आपल्या संघात समावून घेण्यासाठीआतुर होते. पण त्यात यशस्वी झाले दिल्ली डेअरडेव्हील्स. ४.२५ कोटीमध्ये दिल्ली डेअरडेव्हील्सने शमीला खरेदी केले पण इंग्लंड दौऱ्यात खेळलेल्या ३ कसोटी सामन्यांत त्याला अपयश आले परंतु तो एकदिवसीय सामन्यांमधील वरचेवर उल्लेखनिय कामगिरी करत होता त्यातच २०१४ मध्ये एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक बळी मिळवण्याचा पराक्रम केला.

भारतीय उपखंडात शमीच्या रिव्हर्स स्विंग ते फलंदाजांची दाणादाण उडत होती त्यावेळस झहिर खानची जागा काही प्रमाणात भारल्यासारखे वाटते. २०१४ च्या मायदेशात झालेल्या बॉर्डर-गावसकर चषकातील शेवटच्या दोन सामन्यात १२ बळी घेत फिरकी गोलंदाजांना मोलाची साध देत भारताला ४-० ने विजय प्राप्त करुन दिला यासोबतच पूर्णपणे तंदरुस्त नसतानाही २०१५ च्या ऑस्ट्रेलियात झालेल्या विश्वचषकात भारतासाठी सर्वाधिक १७ विकेट घेत भारतीयसंघाला उपांत्य फेरीपर्यंत पोहचवण्यात महत्वाची भुमिका निभावली. त्यातील पाकिस्तानविरूध्द घेतलेल्या ४ बळींनी त्यांच्या फलंदाजीचा कणाच मोडला. सुरूवातीस समोरच्या संघाच्या विकेट घेत प्रतिसस्पर्धीनी अडचणीत टाकले आणि अंतिम षटकांमध्ये यॉर्करचा मारा करणे ही शमीची हातोडी बनली. विश्वचषकाच्या उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलिया विरूध्द शमीला गडी बाद करण्यात अपयश आले आणि भारताला पराभवाला सामेरे जावे लागले होते.

दुखापतीमुळे शमीला २०१५ च्या श्रीलंका व दक्षिण आफ्रिकाविरूध्दच्या मालिकेला मुकावे लागले होते पण त्याचबरोबर २०१६ टी-२० विश्वचषकात सुध्दा भारतीय संघाला शमी शिवाय खेळावे लागले तसेच त्यानंतर आयपीएल सत्रात सुध्दा काहीच सामन्यात त्याने दिल्ली डेअरडेव्हिल्स संघाचे प्रतिनिधित्व केले. त्यानंतरच्या वेस्ट इंडिज विरूध्दच्या मालिकेत त्याने संघात पुनरागमन केले पण ७ डावात त्याला फक्त ७ गडी बाद करण्यात यश आले त्याचप्रमाणे न्युझिलंड व इंग्लंडविरूध्दच्या मालिकेत सुध्दा त्याचा जास्त प्रभाव पडला नाही पण गरजेच्या वेळेस तो कर्णधाराच्या मदतीला धावून आला. या तिन्ही मालिकेत फिरकी गोलंदाजांचा बोलबाला राहिला त्यामुळे गरजेच्यावेळी गडीबाद केल्यानंतरही जलदगती गोलंदाजा झाकोकले गेले. मोहम्मद शमी हा सध्याच्या भारतीय संघाचा महत्वाचा भाग आहे. हे त्याने लक्षात घेतले पाहीजे त्यामुळे त्याने तंदरुस्त राहणे महत्वाचे आहे. जलदगती गोलंदाज दुखापतग्रस्त होतात परंतु एखादी दुखापत त्यांची कारकिर्द संपवु शकते.

## उमेश यादव

उमेश यादव सध्याच्या भारतीय संघाच्या जलदगती गोलंदाजापैकी एक महत्त्वाचा गोलंदाज. एका खाण कामगाराचा मुलगा ज्याने पोलीस होण्याचे ध्येय समोर ठेवले. पण काही कारणास्तव त्याचे आर्मी व पोलीस खात्यात लागण्याचे स्वप्न पुर्ण होऊ शकले नाही. त्यानंतर त्याने क्रिकेटवर आपले लक्ष केंद्रित केले ते १९ व्या वर्षी. उमेश यादवने देशांतर्गत स्पर्धांत

काहीश्या कमी प्रसिद्ध असलेल्या विदर्भ संघाकडून खेळण्यास सुरुवात केली त्यात त्याला संघाचा कर्णधार प्रीतम गंधेने प्रोत्साहीत केले. २००८ च्या रणजी मोसमात विदर्भाकडून खेळताना मध्य प्रदेशविरुद्ध प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि पहिल्याच मोसमात ४ सामन्यांत २० गडी बाद करत सर्वांचे लक्ष वेधले. तसेच सातत्याने १४० कि.मी च्या वेगाने चेंडू स्विंग करण्याच्या शैलीने त्याची प्रचिती आणखीनच वाढली.



२००८ च्या आयपीएल सत्रात दिल्लीच्या संघाने उमेश यादवला आपल्या संघात सामावून घेतले खरे पण २०१० च्या सत्रात त्याला पदार्पणाची संधी मिळाली. त्याचवर्षी टी-२० विश्वचषकाच्या संघात दुखापतग्रस्त प्रविण कुमारच्या जागी उमेशची वर्णी लागली परंतु त्याला सामना खेळण्याची संधी मिळाली नाही. २०१० मध्येच उमेशला झिम्बाब्वेविरुद्ध एकदिवसीय सामन्यात पदार्पणाची संधी मिळाली पण त्यात त्याची कामगिरी अपेक्षानुसार झाली नाही. त्यानंतर त्याची दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी संघात समावेश झाला तरी त्याला अंतिम ११ मध्ये संधी मिळाली ती २०११ च्या वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेत आणि यात संधीचा पुरेपुर फायदा उठवत २ कसोटी सामन्यात ९ बळी मिळवले व कामगिरीच्या जोरावर त्याची ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या संघात निवड झाली. यासोबतच उमेश यादव कसोटी खेळणारा विदर्भाचा पहिला खेळाडु ठरला.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत भारतीय संघाला ४-० ने कसोटी मालिकेत पराभव पत्करावा लागला. एकीकडे संघातील वरिष्ट गोलंदाज जहीर खान व इशांत शर्मा अपयशी ठरत असताना उमेश यादवने १४ गडी बाद करत आपल्या कामगिरीचा करीष्मा दाखवला. त्यात पर्थ मध्ये झालेल्या तीसऱ्या कसोटीत ९३ धावांत ५ गडी बाद करत कारकिर्दीत पहिल्यांदा ५ गडी बाद केले. त्यानंतरचे वर्ष उमेश यादवसाठी तितकेसे योग्य ठरले नाही कारण दुखापतीमुळे तो संघाच्या आत-बाहेर होत होता. त्यानंतर २०१३ च्या चॅम्पियन ट्रॉफीत त्याचे संघात पुनरागमन झाले त्यात ४ गडी बाद केले तसेच अंतिम सामन्यात जोरदार सुरुवात करुन दिली. तसेच त्यानंतरच्या वेस्ट इंडिजमध्ये झालेल्या तिरंगी मालिकेत ७ गडी बाद करत विजयात महत्त्वाची भुमिका पार पाडली. पण मायदेशात २०१३ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध पार पडलेल्या मालिकेत उमेशला संधी मिळाली नाही त्यानंतर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत त्याने पुनरागमन केले खरे पण तो संधीचे सोनं मात्र करु शकला नाही व संघातून बाहेर व्हावे लागले परंतु तरीही त्याचा कसोटीसंघात समावेश करण्यात आला.

२०१४ मध्ये झालेल्या आयपीएलच्या लिलावात कोलकत्ता नाईट रायडर्सने उमेश यादवला आपल्या संघात सामावून घेतले. तसेच आयपीएल मधल्या नियमांमुळे फक्त चार परदेशी खेळाडुंना अंतिम ११ मध्ये स्थान मिळते त्यामुळे भारतीय वेगवान गोलंदाज त्यात तो १४० कि.मी च्या वेगाने चेंडू फेकु शकतो असा एकतरी गोलंदाज आपल्या संघात असावा अस प्रत्येक संघाला वाटत. त्यामुळे संघाचा समतोल साधला जातो. २०१४-२०१६ सत्रापर्यंत उमेश यादव कोलकत्ता संघाचा महत्त्वाचा गोलंदाज राहिला तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर

दैविप्यमान कामगिरी केलेल्या मॉर्ने मॉर्केलसारख्या गोलंदाजाबरोबर गोलंदाजीची मिळालेली संधी उमेशसाठी मोलाची ठरली तर आतापर्यंत त्याने खेळलेल्या ८० आयपीएल सामन्यात ७४ गडी बाद केले.

२०१५ च्या विश्वचषकात उमेश यादवने महत्त्वाची भुमिका पार पाडली यात त्याने ८ सामन्यात भारताकडून सर्वाधिक १८ गडी बाद करत मोहम्मद शमीला मोलाची साथ दिली. पण तो भारतीला संघाला अंतिम सामन्यात पोहचवण्यात अपयशी ठरला. २०१५ मध्ये श्रीलंकेविरुद्धच्या व दक्षिण आफ्रिकेविरुद्ध तसेच २०१६ च्या वेस्ट इंडिज व न्युझिलंड विरुद्धच्या कसोटी मालिकेत उमेशने हातभार लावला पण न्युझिलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत उमेशने सातत्याने सुरुवातीस गडी बाद करत संघाला चांगली सुरुवात करुन दिली या मालिकेत त्याने ८ बळी मिळवले. तसेच फिरकी गोलंदाजांचा दबदबा राहिलेल्या इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत ही उमेश यादवने महत्त्वपुर्ण ८ बळी मिळवले. उमेश यादव भारताच्या कसोटी संघाचा सातत्याने भाग राहिला आहे पण त्याला एकदिवसीय संघातून आत बाहेर व्हावे लागले आहे त्यामुळे त्याला त्याच्या तंदरुस्तीवर व कामगिरीवर सातत्य टिकवावे लागेल.

# ई साहित्य प्रतिष्ठान

इंग्लंडची लोकसंख्या सहा कोटी आहे. आणि महाराष्ट्राची बारा कोटी. इंग्लीश वाचकांची संख्या आहे शंभर कोटी. आणि मराठी वाचक? कुठे आहेत वाचक? कुठे आहे आपली भाषा जगाच्या नकाशावर? कुठे आहोत आपण?

आमची मायबोली जागतिक दर्जाची भाषा आहे! तिला तो मान जगभरातून मिळायला हवा. आणि बाहेरच्यांनी मान देण्यापुर्वी आपण तो द्यायला हवा. माझा मराठाची बोलु कवतुके... अमृतातेही पैजा जिंके.... माउलींनी दाखवलेलं स्वप्न पूर्ण करू तरच आम्ही शिवबाचे मावळे.

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www.esahity.com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 या नंबर ला Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app. https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. download करा.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

टीम ई साहित्य